# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१८

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

**रायगड जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यात सन २०१४ मध्ये एकूण १ हजार २६२ अपघातांची नोंद झाली असल्याबाबत**

**(१) ९५०१ (०८-०४-२०१५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यात विविध पोलीस ठाण्यात सन २०१४ मध्ये एकूण १ हजार २६२ अपघातांची नोंद झाली असून मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्ग क्र. ४, मुंबई-पुणे द्रुतगती महामार्ग, मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र.१७ या मार्गावर मुख्यत्वे अपघात होत असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महामार्गाच्या सुरक्षेबाबत योग्य उपाययोजना शासन करीत नसून महामार्गाची दुरवस्था आणि धोकादायक वळणामुळे वांरवार अपघात होत असून या प्रकरणी शासन आवश्यक ती कार्यवाही करीत नसल्याने नागरिकांचे बळी जात आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन रायगड जिल्ह्यात वाहनांना सुरक्षित प्रवासकरण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०४-२०१८) :** (१) हे खरे आहे.

सन २०१४ मध्ये रायगड पोलीस कार्यक्षेत्राच्या हद्दीतील मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १७ वर ४६२ अपघात, मुंबई पुणे द्रुतगती मार्गावर २११ अपघात, मुंबई पुणे महामार्ग क्र.४ वर १२१ अपघात तर इतर व राज्य मार्गांवर एकूण ४६८ अपघात असे एकूण १२६२ अपघात झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) व (३) महामार्गावर सुरक्षित प्रवास करण्याकरिता खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात :-

चिन्हांकित माहितीचे सूचनाफलक जागोजागी लावण्यात आले आहेत. महामार्गाच्या साईडपट्ट्या भरणे, संरक्षण कठडे उभारणे, रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या झाडांच्या अडथळा

ठरतील अशा फांद्या तोडणे, महामार्गावर रेडियम अक्षरात सूचना बोर्ड लावणे व वळणांचे ठिकाणी रिफलेक्टर्स लावणे अशा प्रकारची कामे करण्यात येत आहेत.

वेगमर्यादेचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांवर तसेच अतिवेगाने गाड्या चालविणाऱ्या वाहनचालकांवर स्पिडगनच्या मार्फतीने केसेस करण्याची मोहिम चालू आहे.

नियमभंग करणाऱ्या वाहनचालकांवर करण्यात आलेली कारवाई पुढीलप्रमाणे :-

मुंबई पुणे राष्ट्रीय महामार्ग क्र. ४

| | केसेस | तडजोड शुल्क (रू.लाखात) |
|---|---|---|
| २०१३ | १०८१७ | १३.२८ |
| २०१४ | ९१४२ | १०.५७ |
| २०१५ | ८८३६ | १०.९२ |
| ऑक्टो- २०१६ | ७५९६ | १२.६४ |

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र. १७

| | केसेस | तडजोड शुल्क (रू.लाखात) |
|---|---|---|
| २०१३ | ३८६४३ | ४६.२० |
| २०१४ | ३४८३७ | ३९.९२ |
| २०१५ | ३९४५७ | ४१.३३ |
| ऑक्टो- २०१६ | ३०८४० | ३५.२० |

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोपरगांव (जि.अहमदनगर) शहर व ग्रामीण पोलीस स्टेशनमधील कर्मचा-यांची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(२) १४४९९ (०७-०४-२०१५). श्रीमती स्नेहलता कोल्हे (कोपरगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोपरगांव (जि.अहमदनगर) शहर व ग्रामीण पोलीस स्टेशन करिता मंजूर पदांपैकी बरीच पदे रिक्त असल्याने पोलीस कर्मचा-यांवर कामाचा ताण येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०१-०६-२०१८) :** (१) व (२) कोपरगाव शहर पोलीस स्टेशनमधील मंजूरी पदसंख्या ५२ पैकी ३८ पदे भरण्यात आलेली असून उर्वरित १४ पदे रिक्त आहेत तसेच नव्याने सुरू करण्यात आलेले कोपरगांव ग्रामीण पोलीस स्टेशन मधील मंजूर पद संख्या ५३ पैकी ३८ पदे भरण्यात आलेली असून उर्वरित १५ पदे रिक्त आहेत. सदरहू पदे भरण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**केळूस, वायंगणी, वेळागर किनारपट्टीवर (जि.सिंधुदुर्ग) भूकंपाचे धक्के जाणवले असल्याबाबत**

**(३) ५३९४४ (२२-०८-२०१६). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.विलासराव जगताप (जत), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **भूकंप पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्गाच्या केळूस, वायंगणी, वेळागर किनारपट्टीवर मोठमोठे आवाज येत असून किनाऱ्यापासून अंतरावर भूकंपाचे धक्केही जाणवले असल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जमिनीखालून बसत असलेल्या धक्क्यांमुळे समुद्रातून काही भूभाग वर येण्याची शक्यता असणे तसेच मोठ्या लाटा व पाण्याची पातळी वाढण्याची शक्यताही भूगर्भ शास्त्रज्ञांनी वर्तवले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, भविष्यात निर्माण होणाऱ्या धोक्यापासून किनारपट्टीवरील रहिवाशांच्या सुरक्षिततेसाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (१८-०५-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र स्किल डेव्हलमेंट योजना राबविणाऱ्या कर्मचाऱ्यांची**
**पन्नास टक्के पदे रिक्त असल्याबाबत**

**(४) ६३४१० (२९-०८-२०१६). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र स्किल डेव्हलमेंट योजनेंतर्गत अभ्यासक्रम प्रत्येक जिल्ह्यात राबविणाऱ्या कर्मचाऱ्यांची पन्नास टक्के पदे रिक्त असल्याचे माहे जून, २०१६ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (०८-०५-२०१८) :** (१) व (२) कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता यंत्रणेमार्फत, महाराष्ट्र स्कील डेव्हलपमेंट योजनेतंर्गत कोणताही अभ्यासक्रम राबविण्यात येत नाही. तथापि सदर यंत्रणेतील जून, २०१६ अखेर रिक्त पदांची संख्या ५३५ इतकी होती. दरम्यान गट-क व गट-ड ची भरण्यात आलेली असून, डिसेंबर, २०१७ अखेर रिक्त पदांची संख्या ३९८ इतकी आहे. सदरची पदेही भरण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शेगांव तालुक्यात (जि.बुलढाणा) तंटामुक्ती अभियानाची अमंलबजावणी होत नसल्याबाबत**

**(५) ७९९८४ (२१-०४-२०१७). श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेगांव तालुक्यात (जि.बुलढाणा) तंटामुक्ती अभियानाची अमंलबजावणी फक्त कागदोपत्री असून जिल्हयातील अनेक समित्या नावापुरत्या असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन हे अभियान प्रत्यक्षात आणून या समित्यात लोकसहभाग वाढविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०५-२०१८) :** (१) नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**एमडी या अंमली पदार्थाचा होत असलेला वाढता प्रसार**

**(६) ८५०४७ (०४-०९-२०१७). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकेनसारखीच नशा पण कमी दरात या वैशिष्ट्यामुळे एमडी हा अंमली पदार्थ अल्पवधीतच तरुणाईसाठी घातक ठरला आहे तसेच सहजपणे उपलब्ध होत असल्याने एमडी ची लोकप्रियता वाढली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एमडीचे सेवन करणाऱ्या व्यक्तींचे आरोग्य एचआयव्ही व टी. बी. झालेल्या रोग्यांपेक्षाही खालावते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, एमडीचा प्रसार रोखण्यासाठी अंमली पदार्थविरोधी पथक, केंद्रीय अंमलीपदार्थविरोधी पथक, राज्य दहशतविरोधी पथक, महसूल गुप्तचर संचालनालय, या यंत्रणांना तितकेसे यश आलेले नसल्याने सदर अंमली पदार्थचा प्रसार रोखण्यासाठी शासनाने कोणती प्रभावी उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०५-२०१८) :** (१) हे खरे नाही.

अंमली पदार्थाची लोकप्रियता त्यांची किंमत/उपलब्धता, तसेच सेवन केल्यानंतर त्वरीत होणारी नशा व बराचवेळ राहणारी नशा यावर अवलंबून असते.

(२) एमडी व अमंली पदार्थाचे सेवन करणा-या व्यक्तीचे आरोग्य व एचआयव्ही व टी. बी. झालेल्या रोग्यांसोबत तुलना करणे संयुक्तिक नाही, असे महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थेचे मत आहे.

(३) एमडी चा प्रसार रोखण्यासाठी अंमली पदार्थ विरोधी कक्ष, मुंबई यांचेकडून सतत कारवाई करण्यात येत आहे. तसेच ड्रग्जचे प्रमाण कमी करण्यासाठी विविध कार्यक्रम हाती घेण्यात आले आहेत. अंमली पदार्थ विरोधी कक्षातर्फे महाविद्यालयीन स्तरावर जानेवारी २०१५ पासून 'ड्रग्ज फ्री कॅम्पस' हा उपक्रम राबवून जनजागृती करण्याचे प्रयत्न चालु केले आहेत. तसेच सार्वजनिक गणेशोत्सव, नवरात्री, दहिहंडी अशा उत्सवाच्या वेळी अंमली पदार्थ विरोधी कक्षाच्या वतीने जनजागृती कार्यक्रम राबविण्यात आले. तसेच वेगवेळ्या एन.जी.ओ. संस्थांच्या वतीने व्यसनाधीन इसमांवर/मुलांवर उपचार करण्यात येतात. तसेच २६ जून हा अंमली पदार्थ विरोधी दिनानिमित्त २६ जून ते १० जुलै असा पंधरवाडा साजरा करण्यात येतो. सदर पंधरवाड्यादरम्यान पुढील प्रमाणे कार्यक्रम घेण्यात आले. अंमली पदार्थ व त्यांचे दुष्परिणाम याबाबत विद्यार्थांना माहिती देणे, फिल्म दाखविणे, माहिती, चर्चासत्र, हॅन्डबील वाटप व भिंती पोस्टर्सचे प्रदर्शन करणे. तसेच प्रचार फेऱ्या, मॅरेथॉन, मोहल्ला कमिटी, पब्लीक मिटींग घेण्यात येतात.

(४) लागू नाही.

---

### चांदूर रेल्वे (जि.अमरावती) येथील बसस्थानक परिसरात अवैध प्रवासी वाहतुक मोठ्या प्रमाणावर होत असल्याबाबत

**(७) *८८८६९* (१४-०८-२०१७). प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांदूर रेल्वे (जि.अमरावती) येथील बसस्थानक परिसरात अवैध प्रवासी वाहतुक मोठ्या प्रमाणावर होत असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी संबंधित पोलीस स्टेशन यांना दुरध्वनीवरुन तसेच लेखी पत्राद्वारे सुचित करुनही अद्यापही उचित कार्यवाही करण्यात येत नसल्याने म.रा.प.महामंडळाचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अवैध प्रवासी वाहतुकीमुळे ये-जा करणा-या वाहनधारक व प्रवाशांची होणारी गैरसोय टाळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०५-२०१८) :** (१) नाही.

(२) पोलीस स्टेशन, चांदूर रेल्वे येथे श्री.विरेंद्र जगताप, मा.वि.स.स. यांनी दिनांक २१.१२.२०१६ रोजी चांदूर रेल्वे बस स्थानक परिसरात अवैध प्रवासी वाहतूक बंद करण्याबाबत पत्र दिले होते. त्या अनुषंगाने पो.स्टे. चांदूर रेल्वे मार्फत मोटार वाहन कायद्यान्वये एकूण ७२० केसेस करुन एकूण रु. ७८,७००/- इतका दंड वसूल करण्यात आला होता.

(३) अवैध प्रवासी वाहतूक करतांना वाहन मिळून आल्यास त्याचेवर प्रचलित मोटार वाहन कायद्याप्रमाणे कारवाई करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मैत्रेय फायनान्स कंपनीने गुंतवणुकदारांची केलेली फसवणुक**

**(८) ९२०१७ (०४-०९-२०१७). श्री.किशोर पाटील (पाचोरा), डॉ.आशिष देशमुख (काटोल), श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम), श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मैत्रेय फायनान्स कंपनीने अनेक गुंतवणुकदारांची फसवणुक केली असून मैत्रैय कंपनी, कंपनीचे संचालक व इतर संचालंकांविरुद्ध आर्थिक फसवणुकीचा गुन्हा अमरावती जिल्ह्याच्या पोलीस स्टेशन येथे माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान दाखल झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच, पाचोरा (जि.जळगांव) शहरासह तालुक्यातील असंख्य ठेवीदारांनी मैत्रेय सर्व्हिसेसमध्ये गुंतवणूक केली असून याबाबतची तक्रार स्थानिक पोलीसांत माहे जून, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अमरावती आर्थिक गुन्हे शाखा यांनी पाहील्या टप्प्यातील विविध ठिकाणची ४७ कोटी रुपयांची स्थावर मालमत्ता जप्त केली असून त्यासंदर्भातील कार्यवाहीचा अहवाल अमरावतीच्या एस.डी.एम. यांनी शासनाकडे पाठविला असून सदरहू मालमत्तेची विल्हेवाट लावण्याचा प्रस्ताव शासणाकडे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास इस्क्रो खात्यावरील रक्कम प्रधान्यक्रमाने ठेवीदारांना देण्यासाठी चार सदस्यांची समिती स्थापन केली असून मैत्रेयाच्या संचालकांची जळगाव येथील मिळकत विक्रीस मुंबई पोलीसांनी हरकत घेतल्याने मैत्रेयच्या गुंतवणुकदारांना परतावा मिळणेस विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, याप्रकरणाची सखोल चौकशी करून त्यानुषंगाने सदरहू कंपनी, कंपनीचे संचालक व इतर यांच्यावर कारवाई करण्याबाबत तसेच गुंतवणूकदारांचे पैसे परत मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०५-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
सदर प्रकरणी सिटी कोतवाली पोलीस स्टेशन, अमरावती शहर येथे गु.र.क्र. १०५/२०१६, भा.दं.वि. कलम ४०६, ४०९, ४२०, १२०(ब) सह कलम ३ व ४ महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम, १९९९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(२) हे अंशतः खरे आहे.

सदर प्रकरणी सन २०१६ मध्ये जळगाव जिल्ह्यात पुढीलप्रमाणे २ गुन्हे दाखल आहेत. १) जिल्हापेठ पोलीस स्टेशन, जळगाव येथे गु.र.क्र. १६५/२०१६, भा.दं.वि. कलम ४०६, ४२०, ३४ सह कलम ३, ४ व ५ महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम, १९९९ अन्वये व २) भुसावळ पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. ९१/२०१६, भा.दं.वि. कलम ४०६, ४२०, ४६८, ४७१, ४२७, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नमुद २ गुन्हे तपासाधीन आहेत.

(३) हे खरे नाही. सदर प्रकरणी जिल्हाधिकारी, अमरावती यांचेकडुन शासनास मालमत्ता जप्त करण्याबाबतचा प्रस्ताव प्राप्त झालेला आहे. मैत्रेय ग्रुप ऑफ कंपनीच्या जप्त केलेल्या मालमत्ता शासन स्तरावरुन दिनांक २९.११.२०१७ व दिनांक ०७.०४.२०१८ च्या अधिसुचनेन्वये संरक्षित करण्यात आलेल्या आहेत.

(४) व (५) मैत्रेय ग्रुप ऑफ कंपनीच्या विरुध्द राज्यभरात दाखल झालेल्या गुन्ह्यांमध्ये गुंतवणुकदारांची संख्या व त्यांनी गुंतवलेली रक्कम तसेच गुन्ह्यांच्या तपासामध्ये सुसुत्रता राहण्याच्या दृष्टीने राज्यस्तरावर अपर पोलीस महासंचालक, म. रा. मुंबई यांचे अध्यक्षतेखाली संनियंत्रण समिती स्थापन करण्यात आली आहे.

तसेच, सदर प्रकरणाची व्याप्ती व गुंतवणुकदारांना त्यांच्या ठेवी परत करण्याच्या दृष्टीने सदर प्रकरणामध्ये सक्षम प्राधिकारी म्हणुन उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन), मुंबई उपनगर, मुंबई यांची नेमणुक केलेली आहे. प्रस्तुत प्रकरणी त्यांचेमार्फत महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्थांमधील) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम, १९९९ अन्वये पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आष्टी पेपर मिल (ता.चामोर्शी, जि.गडचिरोली) येथे आग लागल्याबाबत**

**(९) ९३७६४ (०४-०९-२०१७). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आष्टी पेपर मिल (ता.चामोर्शी, जि.गडचिरोली) येथे दिनांक १३ मार्च, २०१७ रोजी वा त्यासुमारास, आग लागली असता आग विझविण्यासाठी कर्मचाऱ्यांनी धाव घेतली मात्र उपस्थित अधिकाऱ्यानी आग विझवू दिली नाही याबाबत संचालक व अधिकाऱ्यांविरोधात पोलिस स्टेशन आष्टी येथे तक्रार दाखल करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शार्ट सर्किट मुळे आग लागल्याचे चित्र निर्माण करून तसा देखावा संचालक मंडळ व अधिकाऱ्यांनी तयार केला व तशी तक्रारही दाखल केली, हे ही खरे आहे काय,

(३) बजाज अलायन्स इन्शुरन्स कंपनीच्या तपासात सदर आग शार्ट-सर्किटमुळे लागलेली नाही, असा अहवाल दिला असतानाही पोलीस उपविभागीय अधिकारी व वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांनी पेपर मिलच्या अधिकाऱ्यांना वाचविण्यासाठी त्यांच्याशी संगनमत करून या प्रकरणात शासनाची दिशाभूल केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत दोषींना शासन करून कामगारांना न्याय देण्याबाबतचे पत्र मा.मुख्यमंत्री, मा कामगार मंत्री यांना दिनांक २३ मार्च, २०१७ रोजी वा त्यासुमारास देवून सुद्धा अद्यापपर्यंत कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, चुकीच्या पद्धतीने शासनास माहिती देवून दोषींना वाचविणाऱ्या अधिकाऱ्यांवर व आग प्रकरणी दोषी संचालक, जनरल मॅनेजर सह संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर तात्काळ गुन्हे दाखल करून कामगारांना न्याय देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (१७-०५-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
उलट सदर आगीबाबत प्रो-क्लेम कंपनीने सर्व्हे करून बजाज ॲलायन्स इन्श्युरन्स कंपनीला अंतरीम अहवाल दिला असून पेपर मिलला लागलेली आग ही शॉर्टसर्किट होवून लागली असल्याचे नमूद केले आहे.
(४) व (५) मा. लोकप्रतिनिधींनी दिनांक २३ मार्च, २०१७ रोजी पत्र दिले आहे.

दिनांक २६ मार्च, २०१७ रोजी भारतीय कामगार युनियनचे महासचिव यांच्या तोंडी तक्रारीवरुन श्री. राजुकुमार मेंहदीरत्ता, वय ५० वर्षे , महाप्रबंधक व शाखा प्रमुख व श्री. अजय बाबुराव दुरगकर, वय ५२ वर्षे, प्रबंधक मानव संस्थान विभाग, यांचे विरुध्द कर्तव्यात,जबाबदारीत, निष्काळजीपणा व हलगर्जीपणा केल्यावरुन भादवि ४३/२०१७ मधील कलम २८५, ३४ अन्वये पोस्टे आष्टी येथे क्र. गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा तपास पूर्ण करुन मा. प्रथम श्रेणी न्यायालय, चामोर्शी येथे दोषारोप पत्र दाखल केले आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## घाटकोपर (पूर्व) येथील राजावाडी रुग्णालयाची झालेली दुरवस्था

**(१०) ९६०८२ (०२-०१-२०१८). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई उपनगरातील घाटकोपर (पूर्व) येथील राजावाडी रुग्णालयाच्या इमारतीचे छत दिनांक २८ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्या सुमारास कोसळले असून त्या इमारतीची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रुग्णालय इतरत्र स्थलांतर करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०५-२०१८) :** (१) राजावाडी रुग्णालयातील इमारतीचे छत कोसळले नसून, काही कक्षातील छताचे प्लास्टर सैल झाले होते.

सदर प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन, प्राथमिक स्वरुपाचा उपाय म्हणून व कोणत्याही प्रकारची दुर्घटना होऊ नये म्हणून सैल झालेले प्लास्टर तातडीने पाडून घेण्यात आले आहे.

(२) व (३) राजावाडी रुग्णालयाच्या सर्व इमारतींचे सन २०१४ मध्ये मे. रेणुका कन्सल्टंट यांचेमार्फत संरचनात्मक लेखापरीक्षण करुन घेण्यात आले असून, सदर अहवालात इमारत स्थलांतर करण्याबाबत नमूद करण्यात आलेले नाही.

सदर रुग्णालयातील मुख्य इमारतीतील दोन कक्षांची दुरुस्ती माहे जून २०१६ मध्ये पूर्ण झाली असून, मुख्य इमारत (तळमजला + २) इमारतीच्या दुरुस्तीसाठी महानगरपालिकेमार्फत निविदा मागविण्यात आल्या आहेत.

तसेच, सदर रुग्णालयाची प्रशासकीय इमारत व मुख्य इमारत (तळमजला + ४) च्या दुरुस्तीसाठी अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, याबाबतची पुढील कार्यवाही महानगरपालिकेमार्फत सुरु आहे.

---

## नागपूर शहरातील वृद्ध महिलेची झालेली फसवणूक

**(११) ९७०५४ (०६-०१-२०१८). डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील मोतीबा येथील ८२ वर्षीय श्रीमती विठाबाई सोमकुवर यांचा रुपये दीड कोटींचा बाबुलखेडा स्थित भुखंड श्री.उत्तम सहारे याने दुय्यम उपनिबंधक यांच्या सहाय्याने रुपये ११ हजारात घेऊन फसवणूक केल्याची माहिती माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्रीमती विठाबाई सोमकुवर यांनी नागपूर स्थित एसआयटी प्राधीकरणाला तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणात नागपूर शहरातील कुख्यात बिल्डर यांचाही समावेश आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, श्री.उत्तम सहारे, श्री.नरेश मंडल यांनी वृध्द महीला व अपंग मुलाची फसवणूक केल्याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर प्रकरणातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०५-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे.

अर्जदार विठाबाई तुळशीराम सोमकुवर, नागपूर यांनी उत्तम प्रकाश सहारे व नरेश मंडळ यांचे विरुध्द "माझी फसवणूक करुन माझा भूखंड अवैधरित्या विक्री करणेबाबत." अशा विषयाचा अर्ज एस.आय.टी.कडे केला आहे. त्याचा आवक क्र.१३०१/२०१७, दि.२२/०१/२०१७ असा आहे.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) अर्जदार यांचा मुलगा आदिनाथ तुळशीराम सोमकुवर, उत्तम सहारे व नरेश मंडल यांचा जबाब नोंदविण्यात आला आहे.

चौकशीवरुन असे दिसून येते की, अर्जदार यांनी गैरअर्जदार उत्तम सहारे यांना त्यांचा नमूद प्लॉट विकला होता व या व्यवहाराचे पुढील तारखेचा चेक सहारे यांनी अर्जदार यांना दिला होता परंतु नमूद पुढील तारखेच्या चेकची तारीख येण्याच्या अगोदरच अर्जदार यांनी सदरचा प्लॉट त्रयस्थ व्यक्तीला विकल्याचा व्यवहार केल्याचे सहारे यांना माहिती झाल्याने त्यांनी अर्जदार यांना दिलेल्या पुढील तारखेच्या चेकची रक्कम थांबविली व यावरुनच त्यांच्यात वाद सुरु झाला आहे. करीता सदर प्रकरण प्रथमदर्शनी दिवाणीबाब असल्याने निकाली काढण्यात आले व तसे अर्जदार यांना पो. स्टे. मानकापूर जावक क्र.४०/२०१८, दिनांक ७/१/२०१८ अन्वये लेखी सूचना पत्र पाठविण्यात आले.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वारणानगर (जि.कोल्हापूर) व बेथेलहेमनगर (जि.सांगली) येथे पोलीसांनी टाकलेल्या छाप्यातील रक्कमेचा पोलीसांनी केलेला अपहार**

**(१२) ९७१५० (०६-०१-२०१८). श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वारणानगर (ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर) येथील शिक्षक कॉलनीतील फ्लॅटवर पोलीसांनी तसेच बेथेलहेमनगर (जि.सांगली) येथे पोलीसांनी टाकलेल्या धाडीतील रक्कमेचा अपहार केल्याप्रकरणी दोन्ही गुन्ह्यांचा सुरु असलेला तपास पूर्ण झाला आहे काय,

(२) तसेच सदर प्रकरणातील संबंधित ९ आरोपींना केव्हा निलंबित करण्यात आले आहे,

(३) असल्यास, या तपासात काय आढळून आले आहे व त्यानुसार याप्रकरणी पुढे कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०५-२०१८) :** (१), (२) व (३) सदर प्रकरणी कोडोली पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ४८/२०१७ भा. दं. वि. क. ४५४,३८०,१६६,१६७,१२० (ब), ४११, ३४ प्रमाणे दि.१६/०४/२०१७ रोजी व गु.र.नं. ४९/२०१७ भा.दं.वि.क. ४५४, ३८०, ४०९, १२०(ब), १६६, १६७, ३४ दोन गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

सदर दोन गुन्ह्यात ७ लोकसेवक आरोपी असून त्यांच्याविरुद्ध मा. न्यायालयात दोषारोपत्र दाखल करण्यात आले आहे. सदर ७ लोकसेवक आरोपींना दि.१८/०४/२०१७ रोजी निलंबित करण्यात आलेले आहे. प्रकरणाचा पुढील तपास सीआरपीसी कलम १७३(८) प्रमाणे सुरु आहे.

(४) विलंब झालेला नाही.

---

**ठाणे शहरातील शाळा महाविद्यालयाच्या परिसरात अंमली पदार्थांची विक्री होत असल्याबाबत**

**(१३) ९७१६९ (०६-०१-२०१८). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील ठाणे शहरातील शाळा-महाविद्यालयाच्या परिसरात अफू, गांजा, एमडी अशा अंमली पदार्थांची खुलेआम विक्री करण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ठाणे शहरात हुक्का पार्लर आणि पोपट पानातून मादक पदार्थांची विक्री पान टपऱ्यांवर केली जाते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, परिसरातील मुलांच्या पालकांनी स्थानिक लोकप्रतिनिधींच्या मार्फत वरिष्ठ पोलीस निरिक्षक, चितळसर पोलीस ठाणे यांच्याकडे " आमच्या मुलांना या व्यसनाच्या विळख्यातून बाहेर काढा" अशी विनंती वारंवार लेखी पत्राव्दारे केल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे , हे ही खरे आहे

(४) असल्यास, शासनाने अंमली पदार्थांची विक्री करणा-या संबंधीत दोषींवर अद्यापपर्यंत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०५-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) स्थानिक नगरसेविका यांनी दि.०२.०५.२०१७ रोजी "चितळसर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील बाईकर्स, मद्यपि व अंमली पदार्थ सेवन करणाऱ्यांच्या वाढत्या प्रार्दुभावाबाबत" नागरिकांच्या अर्जासह पाठविलेल्या पत्रात पोलीस बीट मार्शल गस्त वाढवुन तेथील हातगाड्या व बेकायदेशीर अतिक्रमण हटविण्याबाबत संबंधितांना निर्देश व्हावेत अशी विनंती लेखी केलेली होती.

त्यानुसार चितळसर पोलीस ठाण्याच्या सर्व बिटमार्शलना तसेच गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी कर्मचाऱ्यांना गस्त करुन गस्ती दरम्यान आढळणाऱ्या बाईकर्सना हटकण्याची आणि त्यांना न थांबण्याची समज दिली आहे. तसेच समज देऊन न ऐकणाऱ्या बाईकर्सवर योग्य ती कारवाई केली जात असून ती कारवाई निंरतर चालू आहे.

तसेच आवश्यक ठिकाणी निवासी संकुलांच्या मदतीने CCTV कॅमेरा कार्यान्वित करण्यात आले असून त्यातील CCTV फुटेज वेळोवेळी तपासले जाते.

(४) चितळसर पोलीस ठाणे व अंमली पदार्थ विरोधी पथक, ठाणे शहर यांनी चितळसर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील लोकपुरम पब्लिक स्कुलच्या गेटच्या बाजुला टपरी समोर, ठाणे येथे दि.२३.९.२०१७ रोजी केलेल्या संयुक्त कारवाईत

१) वरुण सुनिल गुप्ते,

२) अलोक प्रविणकुमार शर्मा,

३) मोहंमद सादीक अब्दुल अजीज फुगावाला,

४) साजीद रमजान खान, यांच्याकडून ७० ग्रॅम क्रिस्टल पावडर हा अंमली पदार्थ तसेच मोबाईल, मोटार सायकल तसेच काही रोख रक्कम असा एकुण १,८१,२००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल कारवाईत जप्त करुन चितळसर पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर क्रमांक ll ३४/१७ अंमली पदार्थ कायदा कलम ८ (क),२२,२९ प्रमाणे गुन्हा दाखल करुन उपरोक्त नमूद इसमांना अटक करुन उपरोक्त गुन्ह्याचा तपास पो.उपनिरी./ NDPS पथक हे करीत आहेत.

तसेच ठाणे पोलीस आयुक्तालय अंतर्गत अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखा, ठाणे शहर या पथकामार्फत व ठाणे पोलीस स्टेशन यांचे संयुक्त मोहिमेअंतर्गत शाळा महाविद्यालयाचे आजुबाजु परिसरात अंमली पदार्थ गांजा, अफु, एमडी व इतर अंमली पदार्थांची विक्री वाहतुक व साठवणूक करणा-या इसमाविरुध्द वेळोवेळी कारवाई करण्यात आलेली असून जानेवारी २०१७ पासून खालीलप्रमाणे गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

| | |
|---|---|
| १) ठाणेनगर पोलीस स्टेशन | : २ |
| २) कासारवडवली पोलीस स्टेशन | : २ |
| ३) वागळे इस्टेट पोलीस स्टेशन | : १ |
| ४) श्रीनगर पोलीस स्टेशन | : १ |
| ५) मुंब्रा पोलीस स्टेशन | : ३ |
| ६) कळवा पोलीस स्टेशन | : २ |
| ७) चितळसर पोलीस स्टेशन | : १ |
| ८) वर्तकनगर पोलीस स्टेशन | : २ |
| ९) खडकपाडा पोलीस स्टेशन | : १ |
| १०) शांतीनगर पोलीस स्टेशन | : १ |
| एकूण | : १६ |

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राष्ट्रीय महामार्ग क्र. ६ नांदुरा येथील (जि.बुलढाणा) जुन्या बस स्टँड जवळ झालेला अपघात

**(१४) ९८०८३ (०६-०१-२०१८). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय महामार्ग क्र. ६ नांदुरा येथील (जि.बुलढाणा) जुन्या बस स्टँड जवळ दिनांक ८ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास श्री. दत्ता पाटील यांच्या गाडीला मागून येणा-या ट्रकने धडक दिली असता ट्रकचालकांबरोबर शाब्दीक चकमक सुरू असतांना नांदुरा पोलीस स्टेशनचे श्री.पराग कोलते यांनी श्री.दत्ता पाटील यांना उध्दट व अरेरावीची भाषा वापरून त्यांचेवर खोटे गुन्हे दाखल केल्याची तक्रार लोकप्रतिनिधीनी मा.गृहराज्यमंत्री (ग्रामीण) व जिल्हाधिकारी, बुलढाणा यांच्याकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार चौकशी करून संबंधित दोषी पोलीस कर्मचा-यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) तसेच श्री. दत्ता पाटील यांच्यावरील दाखल केलेले खोटे गुन्हे मागे घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०५-२०१८) :** (१) हे खरे आहे.

(२) सदर घटनेशी संबंधीत पोलीस कर्मचारी पो.ना. पराग कोलते ब.नं.१४४३ यांची प्राथमिक चौकशी सुरु करण्यात आली आहे. तसेच नमूद पोलीस कर्मचारी यांना कार्यकारी पदावरुन अकार्यकारी पदावर पोलीस स्टेशन नांदूरा येथून पोलीस मुख्यालय बुलडाणा येथे संलग्न करण्यात आले आहे.

(३) श्री.दत्ता पाटील यांचे विरुध्द पोलीस स्टेशन नांदुरा येथे दि.८/०९/२०१७ रोजी अपराध क्र.४२८/१७ कलम ३५३, ३३२, २९४, ५०४, ५०६, ३४ भादवि प्रमाणे दाखल असून गुन्ह्याचे तपासात सबळ पुरावे मिळून आल्याने त्यांचे व इतर आरोपी विरुध्द दोषारोपपत्र तयार करुन वि.न्यायालयात सि.सी.क्र.१४१/१७ दिनांक २२/११/२०१७ नुसार दाखल करण्यात आलेले असून सद्यस्थितीत गुन्हा न्यायप्रविष्ट आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक शहरात मोठ्या प्रमाणात वाढलेल्या सोनसाखळी चोरीच्या घटना**

**(१५) ९८३८७ (०६-०१-२०१८). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक शहराच्या विविध भागात दिनांक १ जानेवारी, २०१७ ते दिनांक १५ ऑक्टोबर, २०१७ या कालावधीत सुमारे ८३ सोनं साखळ्या चोरीच्या घटना घडल्या असून त्यासोबतच घरफोडी, लूटमार, खून, हाणामारी इत्यादी गुन्ह्यांमध्येही दिवसागणिक वाढ होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोनसाखळी चोरीच्या घटनांमुळे महिला वर्गात भितीचे वातावरण निर्माण आहे, हे ही खरे आहे काय,

(३)असल्यास, या प्रकरणी किती गुन्हयांचा तपास लागला आहे व त्यांचेवर कोणत्या कलमांन्वये कारवाई करण्यात आली आहे,

(४) असल्यास, अशा गुन्ह्यांना प्रतिबंध घालण्याकरिता कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०५-२०१८)** : (१) नाशिक शहरात माहे १ जानेवारी २०१६ ते १५ ऑक्टोबर २०१७ पर्यंत घडलेल्या गुन्ह्यांचा तपशील

| अ.क्र. | शिर्षक | १ जानेवारी २०१६ ते १५ ऑक्टोबर २०१६ | | | १ जानेवारी २०१७ ते १५ ऑक्टोबर २०१७ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | दाखल | उघड | टक्के | दाखल | उघड | टक्के |
| ०१ | खून | ३२ | ३१ | ९७% | ३२ | ३० | ९४% |
| ०२ | चैन स्नॅचिंग | ८४ | ५१ | ६१% | ८० | ५६ | ७०% |
| ०३ | दिवसा/रात्री घरफोडी | २३० | ८६ | ३७% | २४८ | ७७ | ३१% |
| ०४ | लुटमार (इतर जबरी चोरी) | १४४ | ८५ | ५९% | ७३ | ४९ | ६७% |
| ०५ | हाणामारी | ९६ | ९१ | ९५% | ६९ | ६६ | ९६% |

(२) सदर कालावधीमध्ये सोन साखळी चोरीचे ८० गुन्हे घडले असून ७०% गुन्हे उघडकिस आलेले आहेत. त्यामुळे सर्वसामान्य जनतेत भितीचे वातावरण नाही.
(३) चैनस्नॅचिंगचे ८० गुन्हे घडले असून त्यापैकी ५६ गुन्हे उघडकिस आलेले आहेत. सदर गुन्ह्यात भा.दं.वि.क. ३९२,३९४ व प्रतिबंधात्मक कायदा, सी.आर.पी.सी. ११० तसेच मु.पो.का. कलम ५६ प्रमाणे तडीपारीच्या कार्यवाही करण्यात आलेल्या आहेत. तसेच चेन साखळी व इतर गुन्ह्यातील चोरीतील आरोपींविरुद्ध मोक्का अन्वये कार्यवाही करण्याची दक्षता ठेवलेली आहे.
(४) अशा प्रकारचे गुन्हे घडु नयेत म्हणून, एक विशेष पथक तयार करण्यात आले असून, त्यांचे मार्फत कॉलनी परिसर जॉगिंग पार्क, बाजारपेठ तसेच ज्या ठिकाणी यापुर्वी अशा घटना घडलेल्या आहेत, त्या परिसरात पेट्रोलींग केली जाते. तसेच बिटमार्शल यांचेमार्फत देखील परिसरात दिवसरात्र पेट्रोलिंग केली जाते. तसेच वरिष्ठ पातळीवर गुन्हे घडणाऱ्या वेळेत अभ्यास करुन त्यादरम्यान संपुर्ण शहरात नाकाबंदी लावली जाते. शहरातील सराफांची वेळोवेळी मिटींग घेवुन त्यांना चोरीचा माल विकत घेवु नये, तसेच विकण्यास आलेल्या व्यक्तीची माहीती कळविण्याबाबत सुचना दिल्या जातात.
(५) विलंब झालेला नाही.

---

**धरमतर खाडी (ता.पेण,जि.रायगड) प्रकल्पबाधीत पेण-अलिबाग संघर्ष समिती सदस्यांवर असलेले खटले मागे घेण्याबाबत**

**(१६) ९८९३४ (०६-०१-२०१८). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धरमतर खाडी (ता.पेण, जि.रायगड) प्रकल्पबाधीत पेण-अलिबाग संघर्ष समितीने मच्छीमारांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी केलेल्या आंदोलनातील समितीच्या सदस्यांविरोधात दाखल केलेले व सध्या प्रलंबित असलेले खटले काढून टाकण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान मा.अध्यक्ष मंत्री मंडळ उपसमिती, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दिनांक ११ फेब्रुवारी, २०१४ रोजीपासून कायदेशीर मार्गाने बेमुदत आंदोलन, उपोषण करणा-या आंदोलनातील समिती सदस्यांवर पोलीसांनी मुंबई पोलीस अधिनियमाच्या तरतुदीखाली गुन्हे दाखल केले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर आंदोलनात जिवीत हानी व मालमत्तेचे नुकसान झाले नसतानाही आंदोलकांविरूध्द खटले प्रलंबित आहेत, हे ही आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून समितीच्या सदस्यांविरोधात दाखल केलेले व सध्या प्रलंबित असलेले खटले तातडीने मागे घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०५-२०१८) :** (१) व (२) होय.
अलिबाग पोलीस ठाणे येथे अनुक्रमे गु.र.क्र. १३/२०१४, खटला क्र. एससीसी १२३/२०१४ व गु.र.क्र.२२/२०१४, खटला क्र. १४७/२०१४ प्रमाणे दाखल आहेत.
(३) व (४) अलिबाग पोलीस ठाणे येथील गु.र.क्र. १३/२०१४, खटला क्र.एससीसी १२३/२०१४ हे प्रकरण मा.न्यायालयातून दि. १४.१०.२०१५ रोजी मागे घेण्यात आले आहे. तसेच अलिबाग पोलीस ठाणे येथील गु.र.क्र.२२/२०१४, खटला क्र. १४७/२०१४ हे प्रकरण, गृह विभाग, शासन निर्णय क्र. पीआरओ-०५१६/ प्र.क्र.१०६/विशा-२, दि. ३०.८.२०१६ अन्वये फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३२१ नुसार राजकीय व सामाजिक आंदोलनातील खटले मागे घेण्याबाबत गठीत करण्यात आलेल्या मंत्रिमंडळ उपसमितीच्या दि. १५.२.२०१८ रोजीच्या बैठकीत निर्णयार्थ ठेवण्यात आले असता, समितीने त्यावर, गुन्हा मागे घेण्यासाठी कोर्टाची अनुमती मागावी, असा निर्णय दिला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोला शहरातील डाबकी रोड येथील पोलीस ठाण्यातील महिला पोलीस उपनिरीक्षकाने विनयभंग प्रकरणी तक्रार नोंदविण्यास दिलेला नकार**

**(१७) ९९४९७ (०६-०१-२०१८). श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला शहरातील डाबकी रोड पोलीस ठाण्यात दिनांक १७ मार्च, २०१७ रोजी वा त्यासुमारास विनयभंग प्रकरणी तक्रार नोंदविण्यास नकार दिल्याने सदर पोलीस स्टेशनच्या महिला पोलीस उपनिरीक्षकावर मा.न्यायालयाने गुन्हा नोंदविण्याचे आदेश दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महिला उपनिरीक्षकावर शासनामार्फत गुन्हा नोंद करुन पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०५-२०१८) :** (१) हे खरे आहे.

अकोला शहरातील डाबकी रोड पोलीस स्टेशन मधील एका महिला पोलीस उप निरिक्षकावर मा.विशेष न्यायालयाने गुन्हा नोंदविण्याचे आदेश दिले आहे.
(२) सदर प्रकरणी संबंधीत महिला उप निरिक्षकावर अप.क्र.२३९/१७ कलम १६६(ब) भादंवि अन्वये दि. २९/८/२०१७ रोजी गुन्हा नोंदविण्यात आला.

उप निरिक्षकासंदर्भातील गुन्ह्यात चार साक्षिदार तपासण्यात आले आहेत. गुन्हा पोलीस तपासावर आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### नागपूर शहरातील कमाल चौक येथे एका मुलाची झालेली हत्या

**(१८) ९९९७३ (०६-०१-२०१८). श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर शहरातील कमाल चौक येथे गौरव हेमराज दरवाडे ह्या मुलाचा भगवानदास भय्यालाल पाली व त्याचा मुलगा व इतर साथीदार यांनी दिनांक ५ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास हत्या केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गौरव हेमराज दरवाडे या मुलाची हत्या झाली असल्यास त्याबाबत त्याची आई श्रीमती संगिता दरवाडे यांनी मा.मुख्यमंत्री यांना मोक्का लावण्यासंदर्भात निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मा.मुख्यमंत्री कार्यालय नागपूर यांनी मा. पोलीस आयुक्त नागपूर यांना दिनांक ४ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास भगवानदास पाली यांचे महानगरपालिकेच्या समाजभवनाच्या समोरील फुटपाथवर असलेल्या पाणीपुरीचे ठेले हटविण्यासंदर्भात पत्र दिले, आहे हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, आजपर्यत तेथील दुकाने हटविण्यात आले नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, गौरव हेमराज दरवाडे या मुलाची हत्या करणाऱ्यास अटक करण्याबाबत व भगवानदास पाली यांचे पाणीपुरीचे ठेले हटविण्यासंदर्भात कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०५-२०१८)** :१) हे खरे आहे.

गुनगुन जनरल स्टोअर्स जवळ दि.५/१/२०१७ रोजी आरोपी रजत पाली व इतर ६ साथीदारांनी गौरव दरवाडे व अभिजीत कांबळे यांना गंभीर जखमी करुन जीवे मारण्याचा

प्रयत्न केल्याने पोलीस स्टेशन पाचपावली येथे अप.क्र.११/१७ क्र.३०७, १४३, १४७, १४८, १४९, १०९ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. उपचारा दरम्यान गौरव दरवाडे यांचा मृत्यू झाल्याने नमूद गुन्ह्यात कलम ३०२ भादंवि प्रमाणे वाढ करण्यात आली.

(२) हे खरे आहे.

मोका कायद्याचे तरतूदीनुसार सदर गुन्हा मोका कायद्याच्या अंतर्गत येत नसल्याने मोका कायदा अंतर्गत कार्यवाही करण्यात आली नाही. तसे श्रीमती संगिता दरवाडे यांना कळविण्यात आले आहे.

(३) हे खरे आहे.

(४) व (५) सदर अतिक्रमणे महापालिका हद्दीत असल्याने आयुक्त, महानगरपालिका, नागपूर यांना पोलीसांमार्फत पत्रव्यवहार करण्यात आला आहे. तसेच कमाल चौक समाजभवन जवळील भगवानदास पाली यांचे तसेच कमाल चौक जवळील समाजभवन फुटपाथवरील पाणीपुरीचे ठेले हटविण्यासंदर्भात महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १०२, ११७ अन्वये कारवाई करण्यात आली आहे.

सबळ पुराव्यांनिशी आरोपीतांविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व जिल्हा सामान्य रुग्णालय अकोला (जि.अकोला) येथील इमारत दुरुस्ती दाखवून बनावट बिलाच्या आधारे गैरव्यवहार केल्याबाबत**

**(१९) १०११८३ (०६-०१-२०१८). श्री.चरण वाघमारे (तुमसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व जिल्हा सामान्य रुग्णालय अकोला (जि.अकोला) येथील इमारत दुरुस्तीबाबतचे काम दाखवून बनावट बिलाच्या आधारे गैरव्यवहार केल्याची तक्रार दिनांक ११ फेब्रुवारी, २०१४ रोजी वा त्यासुमारास ला सिटी कोतवाली पोलीस स्टेशन अकोला येथे स्थानिक लोकप्रतीनिधी यांनी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तक्रारीच्या अनुषंगाने अधीक्षक अभियंता सा.बां.मंडळ यांनी नेमलेल्या एक सदस्य समितीने, चौकशी अहवालात गैरप्रकार झाल्याचे जिल्हा पोलीस अधीक्षक अकोला यांना कळविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, चौकशी अहवालाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०५-२०१८) :** (१) हे खरे आहे.

अर्जदार श्री.गजानन गोपाळराव पुडकर, आसेगांव बाजार, ता.अकोल, जि.अकोला यांनी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या अभियंत्यांनी काहीच काम न करता एस.डी.आर. दुरुस्ती अंतर्गत अंदाजे ४,८५,७५०/- ची रक्कम काढुन संगनमताने खोटे दस्तऐवज करुन शासनाच्या पैशाची अफरातफर केल्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

(२) तक्रारीच्या अनुषंगाने अधीक्षक अभियंता, सा.बां. मंडळ अकोला यांनी चौकशी करुन अहवाल सादर करण्याकरीता अभियंता, मार्ग प्रकल्प विभाग, अकोला यांची नियुक्ती केली आहे. अधीक्षक अभियंता, सा.बां.मंडळ, अकोला यांच्या दि.२४/११/२०१४ च्या पत्रान्वये तक्रारकर्त्याची तक्रार वस्तुस्थीतीस धरुन नाही तसेच तक्रारीत तथ्यांश दिसून येत नाही असे कळविले आहे.
(३) उपरोक्त वस्तुस्थिती लक्षात घेऊन तक्रार अर्ज पोलीस ठाणे स्थरावर नस्तीबंद करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पनवेल जवळील उरण-जेएनपीटी मार्गावरील चिंचपाड गावाच्या हद्दीतील नवीन पुलाचा लोखंडी सळ्यांचा सांगाडा कोसळून झालेली दुर्घटना**

**(२०) १०१९८८ (०६-०१-२०१८). श्री.अनिल बाबर (खानापूर), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पनवेल जवळील उरण-जेएनपीटी मार्गावरील चिंचपाड गावाच्या हद्दीतील काम सुरु असलेल्या नवीन पुलाच्या लोखंडी सळ्यांचा सांगाडा दिनांक १ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास कोसळल्याने पाच कामगार गंभीर जखमी झाले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व जखमी झालेल्या कामगारांना आर्थिक मदत देण्याबाबत तसेच ठेकेदारावर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०५-२०१८) :** (१) हे खरे आहे.
सदर प्रकरणामध्ये जखमी कामगारांची संख्या ४ आहे.
(२) सदर प्रकरणाबाबत चौकशी करुन कॉन्ट्रॅक्टर व सुपरवायझर यांनी निष्काळजीपणे कामगारांच्या जिवीताला धोका पोहोचेल असे वर्तन केल्याने पनवेल शहर पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं.३५३/२०१७ भादंवि कलम ३३७, ३३८, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करुन कारवाई करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कै.नारायण मेघाजी लोखंडे महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्था, मुंबई येथील सल्लागार मंडळाचे मागील १५ वर्षापासून गठन केले नसल्याबाबत**

**(२१) १०२७०४ (१२-०२-२०१८). श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कै.नारायण मेघाजी लोखंडे महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्था, मुंबई येथे सल्लागार मंडळाचे गठन करणे अनिवार्य आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मागील १५ वर्षांपासून सदर सल्लागार मंडळाचे गठन करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सल्लागार मंडळाचे गठन न झाल्याबाबत संबंधिताविरुद्ध कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संभाजी पाटील-निलंगेकर (११-०५-२०१८) :** (१) व (२) हे खरे आहे.

पूर्वीच्या महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ नुसार सल्लागार मंडळ गठन करण्याची तरतूद होती. त्याअनुषंगाने संस्थेकरिता यापूर्वी सल्लागार मंडळाचे गठन करण्यात आले होते. तथापि, १९९४ नंतर सदर मंडळाची पुनर्रचना झालेली नाही, अशी वस्तुस्थिती आहे.

तथापि, सध्याच्या महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम,२०१६ अन्वये यापूर्वीचा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम,१९९४ निरसित केला आहे. सध्या अस्तित्वात असलेल्या महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मध्ये सल्लागार मंडळ गठित करण्याची तरतूद नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वणी (जि.यवतमाळ) येथील ग्रामिण रुग्णालयात प्रसुती झालेल्या**
**एका महिलेच्या बाळाचे अपहरण झाल्याबाबत**

**(२२) १०३२८६ (०६-०१-२०१८). श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी), डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वणी (जि.यवतमाळ) येथील ग्रामिण रुग्णालयात प्रसुती झालेल्या एका महिलेच्या २ दिवसाच्या बाळाचे अपहरण दिनांक ८ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास गणेश वाघमारे व श्रीकांत चुनारकर यांनी केल्याची घटना निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार संबधीत दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०५-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२) श्रीमती नुसरत जबीन गफ्फार शेख वय २३ वर्ष रा.हिंगणघाट, ह. मु. वणी हिची दिनांक ७.११.२०१७ चे सकाळी ७.०० वा. ग्रामीण रुग्णालय वणी येथे प्रसुती होवून बाळाला जन्म दिला. दि. ८ नोव्हेंबर २०१७ रोजी रुग्णालयात खाजगी सफाई काम करणारा गणेश किसन वाघमारे याने त्याचा मित्र श्रीकांत पोचन्ना चुनारकर, रा.वणी याच्या मदतीने बाळाचे अपहरण केले.

सदर बाळ राजु रामु बदावत यांना अपत्य नसल्याने त्यांना देऊन त्या मोबदल्यात ३० हजार रुपये घेतले. बदावत दम्पत्ती बाळाला तेलंगणाकडे नेत असतांना वणी पोलीसांनी त्यांना आसीफाबाद तेलंगणा येथे ताब्यात घेऊन बाळाला सुखरुप त्यांचे आई वडीलांचे ताब्यात दिले.

सदर प्रकरणी वणी पोलीस स्टेशन येथे गु. र. नं.१२२०/२०१७ कलम ३६३, ३६८, ३७०, १२०(ब), ३४ भादंवि प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

गुन्ह्यात पाच आरोपींना दि.८.११.२०१७ रोजी अटक करण्यात आली. सदर गुन्हा तपासावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सहाय्यक शासकीय अभियोक्ता व अतिरिक्त शासकीय अभियोक्ता यांना अद्यावत सॉफ्टवेअर सुविधासह लॅपटॉप देणेबाबत**

**(२३) १०४७४४ (१०-०४-२०१८). श्री.समिर मेघे (हिंगणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दोषसिध्दीचे प्रमाण वाढविण्यासाठी महाराष्ट्रातील तालुक्याचे व जिल्ह्याचे ठिकाणी विविध फौजदारी व सत्र न्यायालयात सरकारच्या बाजूने प्रभाविपणे बाजू मांडण्यासाठी सध्याचे तंत्रज्ञानाचे युगात अद्ययावतपणे माहीती उपलब्ध होण्याकरीता विविध कायद्याचे ग्रंथ व मा. सर्वोच्च व उच्च न्यायालयाच्या निवाड्यातील संदर्भाचा प्रभाविपणे उपयोग करण्याकरीता सर्व सहाय्यक सरकारी अभियोक्ता व अतिरिक्त सरकारी अभियोक्ता यांना अद्ययावत सॉफ्टवेअर सुविधेसह लॅपटॉप पुरविणेबाबत सहायक सरकारी अभियोक्ता व अतिरिक्त सरकारी अभियोक्ता यांच्या संघटनेने मा. मुख्यमंत्री यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दोषसिध्दीचे प्रमाण वाढविण्याबाबत सरकारी वकीलांना इलेक्ट्रॉनिक युगात अद्ययावत ठेवण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०५-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) याबाबत माहिती व तंत्रज्ञान विभाग विभागाशी विचारविनिमय करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मा.मुख्यमंत्री यांच्या हेलिकॉप्टर ला झालेला अपघात**

**(२४) १०४७९५ (१८-०४-२०१८). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल**

**केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.मोहन फड (पाथरी), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भाईंदर (जि.ठाणे) येथे दिनांक ११ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री एका कार्यक्रमासाठी गेले असता त्यांचे हेलिकॉप्टर उतरविण्यात येत असताना हेलिपॅडच्या मार्गात एक केबल आल्याने हेलिकॉप्टरची दिशा बदलून उतरावे लागले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर घटनेची तसेच, मा.मुख्यमंत्री महोदयांच्या हेलिकॉप्टर ला लातूर येथे झालेल्या अपघाताचीही चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार मुख्यमंत्र्यांचे हेलिकॉप्टर हे वारंवार संकटात सापडत असून, याबाबत अधिक दक्षता घेण्याची आवश्यकता असल्याने त्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-०५-२०१८) :** (१) होय.

(२) होय.

(३) अतिमहत्वाच्या व्यक्तींच्या विमान प्रवासासाठी अधिक दक्षता घेण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय क्र.विचासं-१११८/प्र.क्र.१४/ २८-अ, दिनांक २५/१/२०१८ अन्वये मागदर्शक तत्वे निर्गमित केली असून त्याअनुषंगाने अतिमहत्वाच्या व महत्वाच्या व्यक्तींच्या हवाई उड्डाणासाठी अधिक दक्षता घेण्यासाठी मापदंड निश्चित करण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**घोडबंदर (जि.ठाणे) येथील काशी एज्यूकेशन ट्रस्टच्या अधिकाऱ्यांनी कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधीच्या रक्कमेत केलेला गैरव्यहवार**

**(२५) १०५०६५ (११-०४-२०१८). श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घोडबंदर (जि.ठाणे) येथील काशी एज्यूकेशन ट्रस्टच्या श्री.हरिश्चंद्र पांडे, श्रीमती विजयालक्ष्मी पांडे व श्री.कृपाशंकर मिश्रा या तीन अधिकाऱ्यांविरुध्द भविष्य निर्वाह निधी कार्यालयाने कर्मचाऱ्यांच्या पगारातून घेतलेला भविष्यनिर्वाह निधी खात्यात जमा न करता एकूण ८३ हजार ४२० रुपयांचा अपहार केल्याप्रकरणी कापूरबावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला असल्याची बाब दिनांक १७ जानेवारी २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संस्थेमध्ये किती कर्मचारी काम करतात, नियमानुसार सर्व कर्मचाऱ्यांच्या भविष्यनिर्वाह निधी कापण्यात येतो का, तसेच तो शासनाकडे जमा करण्यात येतो का,

(३) असल्यास, कर्मचारी जास्त असूनही कमी कर्मचाऱ्यांना भविष्यनिर्वाह निधीचा फायदा देण्यात येणे, उर्वरीत कर्मचाऱ्यांची नोंद हेतूत: भविष्यनिर्वाह निधीकरीता करण्यात न येणे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत तपास केला आहे काय, तपासाचे निष्कर्ष काय आहेत व तद्नुसार संस्थाचालकांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०५-०५-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) सदर संस्थेमध्ये एकूण ३४ कर्मचारी काम करतात. त्यापैकी १४ कर्मचा-यांच्या भविष्यनिर्वाह निधीची रु. ८३,४२०/- इतकी रक्कम भविष्यनिर्वाह निधी खात्यामध्ये भरणा न करता सदर रक्कमेचा अपहार केला म्हणुन कापुरबावडी पोलीस स्टेशन, ठाणे शहर येथे गु.र.क्र. १५/२०१८, भा. दं. वि. कलम ४०६, ३४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.
नमुद गुन्ह्यातील काशी एज्यूकेशन ट्रस्टच्या ३ संचालकांविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले असुन सदर गुन्हा न्यायप्रविष्ठ आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वुमेन मिशनरी सोसायटीने शासनाचे माझगाव (मुंबई) येथील भुखंड परस्पर विक्री केल्याबाबत**

**(२६) १०५०८० (०७-०४-२०१८). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माझगांव (मुंबई) येथील शासनाच्या मालकीचा २ एकर भूखंड शासनाने 'वुमेन मिशनरी' सोसायटीला सन १९९७ मध्ये भाडेपट्ट्यावर दिलेला असतांना सोसायटीने सन २००५ मध्ये सदर भूखंड हा परस्पर 'कच्छी लोहाना निवास गृह ट्रस्ट' तसेच विकासक 'गोल्ड प्लाझा' यांनी शासनाची परवानगी न घेता विक्री केल्याची तक्रार जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी पोलीसात दाखल केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी सन २०१६ रोजी नोंदविलेल्या (२३२/२०१६ भायखळा पोलीस ठाणे) गुन्ह्याचा तपास पूर्ण झाला आहे काय,
(३) असल्यास, उक्त घटनेची शासनाकडून चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने इतर आरोपींना ताब्यात घेण्याबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२४-०५-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) सदर प्रकरणी भायखळा पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. २३२/२०१६, भा.दं.वि. कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ३४ प्रमाणे दाखल गुन्ह्याचा तपास अंतिम टप्प्यात आहे. नमुद गुन्ह्यात आरोपी मे. गोल्ड प्लाझा डेव्हलपर्स याचे भागीदार व इतर यांनी मा. उच्च

न्यायालयात गुन्हा रद्द होणेकरीता क्रिमीनल अप्लीकेशन नं. ११७६/१६ अन्वये दाखल केली असुन न्यायप्रविष्ठ आहे. दरम्यान सदर गुन्ह्याचा तपास सुरु ठेवावा परंतु आरोपीविरोधात दोषारोपपत्र दाखल करु नये असे मा. उच्च न्यायालयाने आदेशित केले आहे.
(३) व (४) होय. सदर गुन्ह्यात एकुण ८ आरोपी असुन त्यांना मा. सत्र न्यायालयाने अटकपुर्व जामीन मंजुर केला आहे. त्यापैकी ५ आरोपींना अटक करण्यात आली असुन सध्या ते जामीनावर मुक्त आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पूर्व पोयसर (कांदिवली, मुंबई) येथील झोपडपट्टीमध्ये**
**गुन्हेगारीत झालेली वाढ**

**(२७) १०५०९० (११-०४-२०१८). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पूर्व पोयसर (कांदिवली, मुंबई) येथील झोपडपट्टी भागामध्ये मोठ्या प्रमाणात गुंडगिरी वाढल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबतचे किती गुन्हे स्थानिक पोलीस ठाण्यात दाखल झाले आहेत,
(३) असल्यास, सदर झोपडपट्टी भागांमध्ये गुंडाच्या काही टोळ्या कार्यरत असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर ठिकाणची गुंडगिरी कायमची बंद करण्यासाठी प्रशासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०५-२०१८) :** (१), (२) व (३) कांदिवली, पुर्व पोयसर हा परिसर प्रामुख्याने झोपडपट्टी क्षेत्र असुन तेथील परिसरात घडलेली गुन्हेगारी संघटीत अथवा दोन गटांमधील वैमनस्य इत्यादी स्वरुपाची असल्याचे निदर्शनास आलेले नाही.

सदर परिसरात घडलेले गुन्हे तेथील सामाजिक व आर्थिक स्तराच्या झगड्यातुन घडलेले आहेत. सदर कालावधीत घडलेल्या गुन्ह्यांमध्ये गुंतलेल्या व्यक्तींची पार्श्वभुमी संघटीत गुन्हेगारी अथवा गटागटातुन उद्भवलेली गुन्हेगारी इत्यादी स्वरुपाची असल्याचे निदर्शनास येत नाही.
(४) सदर ठिकाणी वेळोवेळी प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येते. तसेच, पोलीस ठाणे स्तरावरील फिरती गस्तीपथक व वाहने, निगराणी पथक व गुन्हे प्रकटीकरण शाखेमार्फत दिवसरात्र गस्त ठेवली जाते. या परिसरातील नागरिक, सामाजिक संस्थांच्या माध्यमातुन पोलीस जनता संबंध वृध्दींगत होण्यासाठी विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात. त्याचबरोबर मोहल्ला कमिटी, कॉर्नर मिटींग आयोजित केल्या जातात.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र राज्यात सार्वजनिक विश्वस्त कायद्याअंतर्गत नोंदणी झालेल्या संस्थाच्या नोंदण्या शासनाने रद्द केल्याबाबत**

**(२८) १०५१६२ (१७-०४-२०१८). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्यात सार्वजनिक विश्वस्त कायद्याअंतर्गत सुमारे ८ लाख संस्थाची नोंदणी झाली असून ८ लाखांपैकी सुमारे ६० हजार संस्थाची नोंदणी शासनाने रद्द केल्याचे दिनांक २४ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील व विशेष करुन मुंबईतील किती संस्थांची नोंदणी रद्द करण्यात आली आहे व किती संस्थांची नोंदणी रद्द करणे अद्याप बाकी आहे,

(३) असल्यास, संस्थेच्या नोंदण्या रद्द करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) असल्यास, धर्मादाय आयुक्त कार्यालयात, लेखा परिक्षण अहवाल तसेच चेंज रिपोर्ट सादर करणे व त्यावर तत्पर कारवाई करण्याच्या दृष्टीने, तसेच चेंज रिपोर्ट सादर न करणा-या संस्थांविरुध्द, अद्याप शासनातर्फे उपाययोजना करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही करण्यात आली तसेच शासनाने या नोंदणी रद्द केलेल्या संस्थांना आपली बाजू मांडण्यासाठी संधी देण्याबाबत व नोंदणीचे पूनर्वसन करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-०५-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) मुंबईतील एकूण ९४५७ संस्थांची नोंदणी रद्द करण्यात आली असून, एकूण ९५१ संस्थांची नोंदणी रद्द करण्याबाबतची कार्यवाही कार्यान्वित आहे. तसेच अकार्यरत संस्था रद्द करण्याबाबतचे स्वयंखुद बदल अर्ज संख्याही प्रलंबित विनावाद बदल अर्जामध्ये समाविष्ट आहे.

(३) महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० मधील सुधारित कलम २२ (३अ) अन्वये नोंदण्या रद्द करण्याबाबतची कारणे खालीलप्रमाणे:-

१. विश्वस्तव्यवस्थेच्या प्रयोजनाची संपूर्णपणे पूर्ती झालेली असणे, किंवा

२. विश्वस्त व्यवस्थेचे प्रयोजन बेकायदेशीर झालेले असणे, किंवा

३. विश्वस्त व्यवस्थेची मालमत्ता नष्ट केल्यामुळे अथवा अन्यथा तिच्या प्रयोजनाची पूर्ती करणे अशक्य झालेले असणे, किंवा

४. विश्वस्त व्यवस्था रद्द करण्या योग्य असल्यामुळे, ती व्यक्तपणे रद्द केलेली असणे, किंवा

५. विश्वस्त व्यवस्थेच्या हेतू पूर्तीसाठी विश्वस्त कोणतेही कार्य करीत नसल्याचे आढळून आलेले असणे, किंवा

६. विश्वस्तांनी गेल्या ५ वर्षांची हिशोबपत्रके सादर न करणे.

(४) महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० मधील सुधारित कलम २२ (३अ) नुसार कार्यवाही करण्यात आली असून, प्रामुख्याने ज्या संस्थांनी/ विश्वस्तांनी गेल्या ५ वर्षांची हिशोबपत्रके सादर केलेली नाहीत अशा संस्थांची विभागनिहाय माहिती धर्मादाय आयुक्त कार्यालयाचे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे. तसेच या यादीला ३० दिवसांचा कालावधी झाल्यानंतर अकार्यरत संस्था स्वयंखुद बदल अर्जाद्वारे रद्द करण्याबाबतची प्रक्रिया करण्यात येत आहे. याबाबत जर एखादी संस्था कार्यरत आहे असे निदर्शनास आल्यास संबंधित विश्वस्तांना महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० मधील कलम ७०, ७० ए अन्वये अपील/रिव्हीजन अर्ज दाखल करण्याची तरतूद आहे. रद्द करण्यात आलेल्या संस्थांची विभागनिहाय माहिती धर्मादाय आयुक्त कार्यालयाचे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

(५) महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० मधील सुधारित कलम २२ (३अ) अन्वये नोंदण्या रद्द करण्याबाबतची कार्यवाही कारणांच्या अनुषंगाने चालूच राहील.

---

## पुणे येथे एल्गार रॅलीमध्ये जमावाला चिथावणी देणारे भाषण करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(२९) १०५५३९ (०६-०४-२०१८). श्री.मोहन फड (पाथरी), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे येथे आयोजित करण्यात आलेल्या एल्गार रॅलीमध्ये देश द्रोहाचा खटल्यातील आरोपी उमर खालिद यांचे दिनांक २९ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास भाषण झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उमर खालिद व जिनेश मेवाणी यांच्याविरुद्ध जमावाला चिथावणी देणे तसेच भडकविणारे भाषण करणे असा गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी या दोघांनाही अटक करून कोणती कारवाई केली वा करण्यात आली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०५-२०१८) :** (१) होय. परंतू सदरचे भाषण हे दिनांक ३१ डिसेंबर, २०१७ रोजी झालेले आहे.

(२) दि.३१.१२.२०१७ रोजी एल्गार परिषदेमध्ये उमर खालिद व जिग्नेश मेवानी यांनी चिथवणीखोर भाषण केल्याबद्दल विश्रामबाग पोलीस स्टेशन येथे गु.रु.नं.०२/२०१८, भादंवि कलम १५३(अ), ५०५(१)(ब), ११७ अन्वये दि.०३.०१.२०१८ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबतचा पुढील तपास सुरु आहे.

(३) सदर प्रकरणी दोघांनाही अद्याप अटक करण्यात आली नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर येथील मिहान प्रकल्पासाठी स्वस्त दरात वीज मिळावी तसेच पुणे जिल्ह्यातील पुरंदर विमानतळाच्या कामाबाबत**

**(३०) १०५७१० (१८-०४-२०१८). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथील मिहान प्रकल्पासाठी स्वस्त दरात वीज मिळावी यासाठी कार्यवाही करण्याच्या सूचना मा.मुख्यमंत्री यांनी महाराष्ट्र विमानतळ कंपनीच्या (एमएडीसी) दिनांक २८ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास झालेल्या बैठकीत दिलेल्या होत्या, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदर बैठकीमध्ये पुणे जिल्ह्यातील पुरंदर विमानतळाच्या कामाबाबत सुध्दा पाठपुरावा करावा अशाही सुचना दिलेल्या होत्या, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार याबाबतीत कोणता निर्णय घेतला व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०५-२०१८) :**(१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) नागपूरजवळील आय.आर.बी. कंपनी व इतर बंद औष्णिक वीज कंपन्यांतून मिहान प्रकल्पासाठी स्वस्त स्पर्धात्मक दरात वीज उपलब्धतेबाबत व खरेदीबाबत चौकशी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीमार्फत सुरु आहे.

पुणे जिल्ह्यातील पुरंदर विमानतळाच्या भूसंपादनास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूरच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या खाजगीकरणाबाबत**

**(३१) १०६२६२ (१८-०४-२०१८). श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.संजय पुराम (आमगाव), श्री.संतोष दानवे (भोकरदन), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्रीमती मंदा म्हात्रे (बेलापूर), श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीतर्फे (एमएडीसी) संचालन करणा-या नागपूरच्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळाची खाजगीकरण प्रक्रिया वर्षभरापासून सुरू असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रक्रियेत पात्र ठरलेल्या पाच कंपन्यासोबत करण्यात येणारा करारनामा आणि महसूल प्रस्ताव सदरील कंपनीतर्फे मंजूरीसाठी राज्यशासनाकडे पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ही प्रक्रिया अंतिम टप्प्यात असूनही अद्याप मुहूर्ताची तारीख निश्चित झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू विमानतळाचे विकास करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०५-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) विमानतळाचा विकास करण्यासाठी विकासकाची निवड करण्याबाबत निविदा प्रक्रिया अद्याप सुरु आहे. विकासकाची निवड झाल्यानंतर प्रत्यक्ष विकासकामांना सुरुवात होईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात उच्च शिक्षण घेणा-या युवतीने आत्महत्या केल्याबाबत**

**(३२) १०६५६४ (१२-०४-२०१८). श्री.विजय औटी (पारनेर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात उच्च शिक्षण घेणा-या कु.रेश्मा गायकवाड (रा.नारायण गव्हाण, ता.पारनेर, जि.अहमदनगर) या तरुणीने प्रियकराच्या त्रासाला कंटाळून आत्महत्या केल्याचे दिनांक १५ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पोलीसांनी या प्रकरणाची चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार मयत मुलीच्या प्रियकराला अटक करून त्याच्याविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०५-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) प्रियकराच्या त्रासाला कंटाळून दिनांक १५.०१.२०१८ रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात हॉस्टेलमध्ये ओढणीच्या सहाय्याने पंख्याला गळफास घेऊन आत्महत्या केली, हे खरे आहे.

सदर प्रकरणी दिनांक १६.०१.२०१८ रोजी चतु:श्रृंगी पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.२२/२०१८ भा.दं.वि. कलम ३०६, ५०६, ३२३ प्रमाणे एका आरोपीविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून, सदर गुन्ह्यात त्यांस दिनांक १७.०१.२०१८ रोजी अटक करण्यात आली आहे. सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्न सोडविण्याबाबत**

**(३३) १०७११४ (११-०४-२०१८). श्री.सुनिल राऊत (विक्रोळी), श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.जयप्रकाश मुंदडा (बसमत), श्री.तुकाराम काते (अणुशक्ती नगर), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.किशोर पाटील (पाचोरा), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.प्रताप सरनाईक (ओवळा माजिवडा), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री. छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गत ६१ वर्षे प्रलंबित असलेला महाराष्ट्र कर्नाटक सीमा प्रश्न तातडीने सुटावा यासाठी शासनाने अलिकडेच राज्याचे मा.महसूल मंत्री यांची समन्वयक म्हणून नियुक्ती केली आहे, हे खरे आहे काय,
(२) महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्नी महाराष्ट्र शासनाने नियुक्त केलेल्या उच्चधिकार समितीची बैठक गत २ वर्षात झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याची कारणे काय आहेत,
(४) तसेच महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्न सोडविण्यासाठी राज्य शासनातर्फे गत दोन वर्षात केलेल्या कार्यवाहीचे स्वरूप काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०५-२०१८) :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) महाराष्ट्र-कर्नाटक सीमा प्रश्न सोडविण्यासाठी गठित केलेल्या उच्चाधिकार समितीची दि.७ जुलै, २०१६ रोजी सह्याद्री अतिथीगृह, मुंबई येथे महत्वपूर्ण बैठक संपन्न झाली आहे. सदर बैठकीत मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या दावा क्र.४/२००४ च्या संदर्भात घेतलेल्या निर्णयानुसार (अ) विशेष समुपदेशी श्री.विनोद बोबडे यांच्या निधनामुळे त्यांच्या जागी दि.०७/०७/२०१६ च्या आदेशान्वये ॲड.अरविंद दातार यांची "विशेष समुपदेशी" म्हणून नियुक्ती करण्यात आली. (ब) नवी दिल्ली येथील विशेष कक्षातील सीमाप्रश्नासंबंधीचे कामकाजासाठी व शासनाशी योग्य तो समन्वय राखण्यासाठी दि.०८/०७/२०१६ च्या आदेशान्वये सचिव तथा आयुक्त (गुंतवणूक व राजशिष्टाचार), महाराष्ट्र सदन, नवी दिल्ली यांची "वरीष्ठ समन्वयक" म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच (क) सदर दाव्यामध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने स्थापन केलेल्या मा.कोर्ट कमिश्नरपुढे साक्षी पुरावे सादर करण्यासाठी तज्ञ साक्षीदारांची प्रतिज्ञापत्रे तयार करण्याच्या अनुषंगाने केलेल्या सर्वेक्षणाकरिता, मध्यवर्ती महाराष्ट्र एकीकरण समितीने अदा केलेल्या रक्कमेची प्रतीपूर्ती दि.२७ मार्च, २०१७ च्या शासन ज्ञापनान्वये करण्यात आली आहे.

मा.कोर्ट कमिश्नरपुढे साक्षी पुरावे सादर करण्यासाठी नियुक्त केलेल्या तज्ञ साक्षीदारांची प्रतिज्ञापत्रे तयार करण्याकरिता वकील महोदयांच्या नियमित बैठका होत असून प्रतिज्ञापत्रे तयार करण्याचे कामकाज अंतिम टप्प्यात आले आहे.

दाव्याच्या अनुषंगाने कामकाज व मार्गदर्शन करण्यासाठी मा.डॉ.(प्रा.) एन.डी.पाटील यांच्या अध्यक्षतेखालील तज्ञ समितीच्या आवश्यकतेनुसार मुंबई, पुणे व कोल्हापूर येथे बैठका आयोजित करण्यात येतात. त्यानुसार दि.२७/१०/२०१६ व दि.२९/०६/२०१७ रोजी मा.मुख्य सचिव यांच्या दालनात झालेल्या तज्ञ समितीच्या बैठकीत ठरल्यानुसार मा.पंतप्रधान यांना दि.२९ जुलै २०१७ च्या पत्रान्वये, गृह मंत्रालय, केंद्र सरकार यांनी मा.सर्वोच्च न्यायालयात सुनावणी वेळी नि:पक्ष भूमिका घेण्याबाबत निर्देश द्यावेत अशी विनंती केली आहे. तसेच यासंदर्भात मा.समन्वयक मंत्री, सीमा प्रश्न यांनी केंद्र शासनाचे कायदा मंत्री यांची दि.२६ सप्टेंबर, २०१७ रोजी नवी दिल्ली येथे भेट घेऊन त्यांना सुध्दा विनंती केली आहे.

दि.२३/०१/२०१७ रोजी मा.सर्वोच्च न्यायालयाच्या त्रिसदस्यीय पीठासमोर अंतरिम अर्ज क्र. I.A.११, १२ व १३/२०१४ व I.A.१४/२०१५ वर सुनावणी झाली. त्यावेळी मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.१२/०९/२०१४ रोजी पारीत केलेल्या आदेशात सुधारणा करण्याबाबत कर्नाटक शासनाने दाखल केलेल्या इंटरलोकुटरी अर्ज क्र. I.A.१२/२०१४ वरील सुनावणीमध्ये, मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.१३/१२/२०१२ रोजीच्या आदेशाने निश्चित केलेल्या वादाच्या मुद्यांतील मुद्दा क्र.१ नुसार मूळ दाव्यामधील, कर्नाटक शासनाने उपस्थित केलेल्या दाव्याच्या वैधतेबाबतच्या मुद्याच्या अनुषंगाने वादी व प्रतिवादी यांनी पुढील सुनावणीपूर्वी आपले म्हणणे मांडावे, तसेच यासंदर्भातील पुढील सुनावणी दि.१० मार्च, २०१७ रोजी ठेवण्यात यावी, असे मा.सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिले आहेत. तथापि, दि.१० मार्च, २०१७ रोजीची व त्यानंतर

दि.३१/०७/२०१७ रोजी ठेवण्यात आलेली सुनावणी यादीमधून वगळण्यात येवुन सदर सुनावणी दि.१०/१०/२०१७ ठेवण्यात आली होती. तथापि याबाबत मा.सर्वोच्च न्यायालयाचे घटनात्मक खंडपीठ गठित न झाल्याने सुनावणी होवु शकली नाही. महाराष्ट्र शासनाने इंटरलोकुटरी अर्ज क्र. I.A.१२/२०१४ च्या अनुषंगाने आपले म्हणणे सर्वोच्च न्यायालयात दि.९/१०/२०१७ रोजी दाखल केले आहे. पुढील सुनावणीची तारिख निश्चित झालेली नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई उपनगरातील अंधेरी येथील अण्णानगर शिवशक्ती आणि कासमनगर एस.आर.ए सहकारी गृहनिर्माण संस्थेतील सदस्यांना व स्थानिक झोपडपट्टीवासियांना एल अॅड टी. कंपनीला विकासक म्हणून निवडण्यासाठी धमक्या दिल्या जात असल्याबाबत**

**(३४) १०७५१७ (१२-०४-२०१८). श्री.संजय केळकर (ठाणे), अॅड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई उपनगरातील अंधेरी येथील अण्णानगर शिवशक्ती आणि अंधेरी कासमनगर एस.आर.ए सहकारी गृहनिर्माण संस्थेतील सदस्यांना व स्थानिक झोपडपट्टीवासियांना एल अॅड टी. कंपनीला विकासक म्हणून निवडण्यासाठी काही गुंडाकडून विविध आमिषाबरोबर धमक्या दिल्या जात असल्याची तक्रार मा.मुख्यमंत्री व मुंबई पोलीस आयुक्त यांच्याकडे दिनांक १ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, धमकावण्यासाठी बाऊन्सर्सचा वापर करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या तक्रारीनुसार चौकशी करण्यात आली आहे काय, त्यात काय आढळून आले व तद्नुसार पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०५-२०१८) :** (१) प्रस्तुत प्रकरणी अंधेरी अण्णानगर शिवशक्ती (एस.आर.ए.) सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित या संस्थेचे अध्यक्ष व सचिव यांचा दिनांक २९.१२.२०१७ चा तक्रार अर्ज पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या कार्यालयास प्राप्त झालेला आहे.
(२) हे खरे नाही. सदर ठिकाणी एल अॅड टी कंपनीने त्यांचे ऑफिसच्या सुरक्षिततेकरिता सुरक्षा रक्षकांची नेमणुक केलेली आहे.
(३) सदर तक्रार अर्जातील अर्जदार व विरोधक यांच्यात एस.आर.ए. च्या संबंधाने वाद असून सदर ठिकाणी कोणत्याही प्रकारचा कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये म्हणून अर्जदार व विरोधक यांना अंबोली पोलीस ठाणे येथे बोलावून वारंवार मिटींग घेण्यात आलेल्या आहेत. तसेच, विभागामध्ये कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये व शांतता अबाधित रहावी याकरीता अर्जदार व विरोधकांना फौ.प्र.सं. १९७३ चे कलम १४९ अन्वये शांततेचा भंग न करण्याबाबत नोटीसा देण्यात आलेल्या आहेत. त्याचप्रमाणे, सदर भागात पोलीसांची गस्त वाढवण्यात आलेली आहे.

तसेच, अर्जदार यांना धमकी देणेप्रकरणी अंबोली पोलीस ठाणे येथे दि. २४.४.२०१८ रोजी अदखलपात्र गुन्हा नोंद क्र. ११४५/२०१८, भा.दं.वि. कलम ५०६ अन्वये नोंद करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे सदर सोसायटीतील सभासदांचे परस्परविरोधी तक्रारअर्ज प्राप्त झाल्याने अदखलपात्र गुन्हे नोंद केलेले आहेत. या प्रकरणी दोन्ही पक्षकारांची बैठक आयोजित करुन शांतता राखण्याची समज देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सुरक्षा रक्षकांकडे कर्तव्यावर असतांना कोणतेही शस्त्र नसल्याबाबत**

**(३५) १०९४६३ (०५-०४-२०१८). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शासकीय तथा निमशासकीय कार्यालयांमध्ये विविध कंपन्यांच्या माध्यमातून सुरक्षा रक्षक कंत्राटी पद्धतीने पुरविले जात असून या सर्व सुरक्षा रक्षकांकडे कोणतेही शस्त्र नसते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू सुरक्षा रक्षकांकडे शस्त्र नसल्याने अनेक ठिकाणी दरोडे, चो-या, सुरक्षा रक्षकांना मारहाण असे प्रकार नेहमी घडत असतात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अशा खाजगी सुरक्षा रक्षकांना शस्त्र सुरक्षा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०५-२०१८) :** (१) महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळातर्फे विविध शासकीय/निमशासकीय कार्यालयांमध्ये नेमण्यात आलेल्या सुरक्षा रक्षकांना आवश्यकते प्रमाणे शस्त्रे पुरविण्यात आलेली आहेत.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक शहरात नागरिकाच्या बँक खात्यातून सुमारे २ लाख ४० हजार रुपये फसवणुकीने काढून घेतल्याबाबत**

**(३६) १०९५२४ (१८-०४-२०१८). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक शहरात सायबर गुन्ह्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असून येथील चांडक सर्कलवरील उष:काल सोसायटीमधील रहिवाशी जेष्ठ नागरिक सुभाष बाबुराव व्यवहारे यांची

एका अज्ञात भामट्याने क्रेडिट कार्डवरुन त्यांच्या बँक खात्यातून सुमारे २ लाख ३९ हजार २५० रुपयांची फसवणूक केली असल्याचे दिनांक १२ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात नाशिक ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या गुन्ह्याचा तपास करुन आरोपीला अटक करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच सायबर गुन्हे प्रतिबंधित करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०५-२०१८) :** (१) हे खरे आहे. तथापि, सदरील घटना दि.१०.०८.२०१७ ते १५.०८.२०१७ दरम्यान घडली आहे.

(२) होय. या संदर्भात सायबर पोलीस ठाणे, नाशिक शहर, येथे गुरनं ०१/२०१८ भा.द.वि. क्र.४२० सह मा.तं.अधि २००० चे कलम ६६ (क)(ड) प्रमाणे दि. १०.०१.२०१८ रोजी अज्ञान इसमाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) फिर्यादी यांचे क्रेडीट कार्डला रजिस्टर असलेल्या मोबाईल नंबर वरील आलेला ओटीपी नंबर, फिर्यादी यांची फसवणूक करुन आरोपीने तो ओटीपी नंबर मिळवून घेतला. तद्नंतर फिर्यादी यांचा रजिस्टर्ड मोबाईल नंबर बदलून इंटरनेटच्या माध्यमातून Payzapp, Paytm, Airtel Money, Idea Payment, Oxigen Wallet, Mobikwik असे विविध वॉलेटचा वापर करुन फिर्यादी यांचे पैसे काढलेले आहेत. संबंधित वॉलेट कंपनींना ईमेलद्वारे स्टॉप पेमेंट करण्यासाठी विनंती केली असून सदर वॉलेट वरुन पैसे पुढे ट्रान्सफर झालेली असल्यास सदरची रक्कम कुठे व कोणत्या ठिकाणी ट्रान्सफर झाली आहे याबाबत तपास सुरु आहे. तसेच आरोपीने गुन्ह्यात वापरलेले मोबाईल नंबरची माहिती मागविण्यात आली आहे. फिर्यादी यांचे ईमेल आयडीचाही आरोपीने वापर केला असून त्याबाबत सुद्धा गुगल कंपनीस आय.पी. ॲड्रेस व लॉग डिटेल्सची माहिती मिळणेकामी ईमेलद्वारे पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे. फसवणुकीच्या गुन्ह्याचा तपास चालू असून महाराष्ट्र राज्यामध्ये याचे कुठेकुठे पाळेमुळे आहेत याचा शोध घेतला जात आहे.

तसेच सर्व सामान्य नागरीकांची फसवणूक होवू नये याकरीता सायबर पोलीस ठाणे नेमणुकीचे अधिकारी, कर्मचारी मार्फत नाशिक शहरातील विविध शाळा, कॉलेजस्, सोसायटीज्, औद्योगिक संस्था, बँका, बाजार पेठा, मॉलस् व आर्थिक व्यवहार चालणारे इतर ठिकाणी सायबर क्राईम अवरनेस प्रोग्राम घेण्यात येवून नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर येथील अंबाबाई मंदिरात पगारी पुजारी नेमण्याबाबत**

**(३७) १०९७४१ (१८-०४-२०१८). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर येथील अंबाबाई मंदिरात पगारी पुजारी नेमण्याच्या कायद्याचे प्रारूप तयार करण्याचे काम गत तीन महिन्यांपासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अंबाबाई मंदिरात पगारी पुजारी नेमण्याच्या मागणीसाठी स्थापन करण्यात आलेल्या संघर्ष समितीने दहा हजार पानांचा पुराव्याची कागदपत्रे शासनाला सादर केलेली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अंबाबाई मंदिरात पगारी पुजारी नेमण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०५-२०१८) :** (१) हे खरे नाही.
श्री करवीर निवासिनी मंदिर, कोल्हापूर या मंदिरात पगारी पुजारी नियुक्त करण्याबाबत श्री करवीर निवासिनी महालक्ष्मी (अंबाबाई) मंदिर (कोल्हापूर) हा अधिनियम दि.१२.०४.२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आला आहे.
(२) होय, हे खरे आहे.
अंबाबाई मंदिरात पगारी पुजारी नेमण्याच्या मागणीसाठी स्थापन करण्यात आलेल्या संघर्ष समितीने जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना कागदपत्रे सादर केली आहेत.
(३) श्री करवीर निवासिनी महालक्ष्मी (अंबाबाई) मंदिर (कोल्हापूर) या अधिनियमातील तरतूदीनुसार पगारी पुजारी नियुक्त करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रेल्वे अपघातातील ९०० मृतदेह बेवारस पडून असल्याबाबत

**(३८) १०९८९२ (११-०४-२०१८). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई उपनगरी रेल्वे अपघातात मागील वर्षी ३ हजार व्यक्तींचा मृत्यू झाला असून त्यांपैकी ९०० मृतदेह ओळख न पटल्यामुळे बेवारस पडून असल्याचे दिनांक १८ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास, निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गत वर्षी (२०१७ मध्ये) कुर्ला, कल्याण, ठाणे आणि वसई येथे सर्वाधिक अपघात झाल्याची नोंद आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर बाबतीत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०५-२०१८) :** (१) मुंबई लोहमार्ग पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत सन २०१७ मध्ये ३०१४ व्यक्ती अपघातात मयत झालेल्या आहेत. त्यापैकी ८९९ व्यक्तींचे मृतदेह अद्यापही ओळख न पटल्यामूळे बेवारस आहेत.

(२) सन २०१७ मध्ये मुंबई लोहमार्ग पोलीस आयुक्तालयातील १) कुर्ला रेल्वे पोलीस ठाणेच्या हद्दीत ३३१, २) ठाणे रेल्वे पोलीस ठाणेच्या हद्दीत ३२४, ३) कल्याण रेल्वे पोलीस ठाणेच्या हद्दीत ३६८, ४) वसई रोड रेल्वे पोलीस ठाणेच्या हद्दीत २३५ व्यक्ती अपघाती मयत झाले आहेत.

(३) बेवारस मृतदेहाची ओळख पटविण्यासाठी पुढीलप्रमाणे उपाययोजना केल्या जातात.

अ) बेवारस मयताच्या शोधाकरिता मुंबई लोहमार्ग पोलीसांच्या www.shodh.gov.in या वेबसाईटवर माहिती व फोटो तातडीने अपलोड केले जातात.

ब) बेवारस मयताची ओळख पटली नाही तर मृताची छायाचित्रे, बोटाचे ठसे, चेहरेपट्टी घेऊन ते पोलीस राजपत्रात प्रसिध्दी करिता राज्य गुन्हे अन्वेषण विभागाकडे पाठविले जाते. तसेच, मृताचे कपडे, मोबाईल फोन, इतर वस्तु जपुन ठेवल्या जातात.

क) बेवारस मयताच्या कपड्याचे लेबल, व्हिजीटींग कार्ड, बँक पासबुक, लायसन्स, इतर कागदपत्रे व आत्महत्येबाबत चिठ्ठी हे तपासुन पाहुन त्यावरुन नातेवाईकांचा शोध घेतला जातो.

ड) मुंबई शहरच्या मिसिंग पर्सन्स ब्युरोला तात्काळ मयताचे फोटो व माहिती देण्यात येवुन तेथील हरवलेल्या व्यक्तींच्या नोंदीशी मयताबरोबर पडताळणी केली जाते.

तसेच, अपघात प्रवणक्षेत्राचा अभ्यास करुन त्यामध्ये १७४ अपघाताची ठिकाणे दाखवुन त्यावर कार्यवाही व उपाययोजना करण्याबाबत मध्य व पश्चिम रेल्वेला पत्रव्यवहार करण्यात आलेला आहे. त्याचबरोबर अपघात रोखण्याच्या दृष्टीने रेल्वे ट्रॅकच्या बाजुला कॉन्सरटिना कॉईल व संरक्षक भिंत बांधण्यासंदर्भात मध्य व पश्चिम रेल्वेला पत्रव्यवहार केलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कल्याण (जि.ठाणे) पश्चिमेकडील बेतुरकर पाडा येथे रोकडे कॉलनी जवळ ३५ वर्षापासून राहणा-या कुटुंबांवर विकासक दादागिरी करीत असल्याबाबत**

**(३९) ११०१६४ (१२-०४-२०१८). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.नरेंद्र पवार (कल्याण पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (जि.ठाणे) पश्चिमेकडील बेतुरकर पाडा येथे रोकडे कॉलनी जवळ ३५ वर्षापासून राहणा-या कुटुंबाना विकासकाकडून धमकाविण्यात येत असल्याच्या तक्रारी दिनांक १८ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास तेथील स्थानिकांनी पोलीसांना व तहसिलदारांना लेखी निवेदनाद्वारे सादर केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार संबंधीत दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०५-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

सदर प्रकरणी अर्जदार यांनी दि.१९.१२.२०१७ व दि. २४.१२.२०१७ रोजी अर्ज दाखल केले आहेत. तसेच, बाजारपेठ पोलीस स्टेशन येथे अदखलपात्र गुन्हा रजि. क्र. ७९९/२०१७ भा.दं.वि. कलम ४२७, ५०४, ५०६ प्रमाणे दाखल आहे.

(२) सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली असुन, त्यानुसार सन २००० मध्ये सदरची जागा मुळ मालकाकडुन विकासक श्री.के.डी. जाधव यांनी विकत घेतलेली आहे. तसेच, सन २०१३ मध्ये विकासकाला सदर जागा करारपत्राने विकसित करण्यासाठी दिल्यानंतर तेथील ४० भाडेकरुंनी विकासकाविरुध्द मा.न्यायालयात दिवाणी दावा दाखल केला असुन सध्या तो न्यायप्रविष्ठ आहे. विकासक यांनी अद्यापपावेतो सदरची जागा विकसित केलेली नाही.

विकासक यांना कल्याण-डोंबिवली महानगरपालीका, नगररचनाकार यांनी दि.१७.११.२०१३ रोजी पुनर्बांधणीचे आदेश दिले आहेत. तसेच, उपविभागीय अधिकारी, उल्हासनगर यांनी अर्बन अन्ड सिलींग अन्ड रेग्युलेशन १९७६ च्या मार्गदर्शन सुचना व न्यायनिवाडा दि. ३०.०१.१९९० व दि. १७.११.१९९५ अन्वये आदेश पारित केलेले आहेत. त्यामुळे सदरची बाब दिवाणी स्वरुपाची असल्याचे आढळुन आले असुन सबंधितांना दिवाणी न्यायालयात जाण्याची समज देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपुर मध्यवर्ती कारागृहातील बंदीजनाच्या आरोग्याच्या सुरक्षेच्या दृष्टीने 'टेली मेडिसिन' सुविधा सुरु करण्याबाबत

**(४०) ११०६२१ (१२-०४-२०१८). डॉ.आशिष देशमुख (काटोल) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपुर मध्यवर्ती कारागृहातील बंदीजनाच्या आरोग्याच्या सुरक्षेच्या दृष्टीने 'टेली मेडिसिन' सुविधा सुरु करण्यात आल्याचा दावा अपयशी ठरला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डॉक्टरांनी लिहून दिलेली औषधे आजारी कैद्यांना वेळीच उपलब्ध करुन देण्याऐवजी १५ ते २० दिवसांपर्यंत मिळत नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, नागपुर मध्यवर्ती कारागृहातील आजारी कैद्यांची बाब लक्षात घेता 'टेली मेडिसिन' सुविधा उपलब्ध करण्यासंबंधी शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०५-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.

नागपूर मध्यवर्ती कारागृहात दि. २९.०५.२०१७ रोजी टेली मेडिसिन सुविधा सुरु करण्यात आली असून, सदरची सुविधा आज सुरु आहे.

नागपूर मध्यवर्ती कारागृहाच्या आस्थापनेवर एकूण ४ वैद्यकीय अधिकारी, ०१ मिश्रक, ०३ परिचारक, ०२ चिकित्सालयीन मानसशास्त्रज्ञ कार्यरत आहेत. आजारी बंदी रुग्णावर वेळीच उपचार व तपासणी करुन मिश्रकामार्फत बंद्यांना तात्काळ औषध वाटप करण्यात येते. तसेच ज्या रुग्ण बंद्यांना बाहेरील शासकीय बैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात पाठविण्यात येते त्यांनाही तात्काळ औषधे पुरविण्यात येतात.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर जिल्हयातील कळमेश्वर येथील नविन न्यायालयाच्या इमारतीतील फर्निचरसाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत**

**(४१) ११०८७१ (१७-०५-२०१८). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कळमेश्वर (जि.नागपूर) येथील न्यायालय इमारतीचे नव्याने बांधकाम करण्यात आले असून या कार्यालयात आवश्यक असे फर्निचरची व्यवस्था करण्याबाबतच्या रूपये ८७ लक्ष ५३ हजार ४९० च्या कामास दिनांक २५ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामास अद्यापही निधी उपलब्ध करून देण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निधी उपलब्ध करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-०५-२०१८) :** (१) होय.

(२) हे, खरे नाही.

(३) कळमेश्वर, जि.नागपूर येथील नविन न्यायालयीन इमारतीस फर्निचरकरीता सार्वजनिक बांधकाम विभाग, ज्ञापन क्रमांक अनिवि-२०१७/प्र.क्र.६७/अर्थ-२, दिनांक ३१ जुलै २०१७ अन्वये रु.९.०० लक्ष व दिनांक २२ डिसेंबर २०१७ अन्वये रु.५०.०० लक्ष असा एकूण रु.५९.०० लक्ष इतका निधी सन २०१७-१८ मध्ये अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नागपूर यांना वितरीत करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**श्रीक्षेत्र पंढरपूर (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) येथे येथे विमान सेवा सुरू करण्याबाबत**

**(४२) ११०८९१ (१८-०४-२०१८). श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दक्षिण भारताची काशी म्हणून श्रीक्षेत्र पंढरपूर (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) येथे देशाच्या काना-कोपऱ्यातून लाखो भाविक भक्त श्री.विठ्ठलाच्या दर्शनाला येत असतात, भाविकांना सुविधा मिळणेकरिता व त्यांच्या प्रवासातील गैरसोय टाळण्यासाठी पंढरपूर येथे विमान सेवा सुरू करणार असल्याचे दिनांक १३ जानेवारी, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पंढरपूर येथे विमानतळ, विमान सेवा सुरू करण्याबाबतचा अहवाल किंवा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठविला आहे काय,
(३) असल्यास, पंढरपूर येथे विमानसेवा उपलब्ध होणेबाबत शासनाने अद्यापपर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०५-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात सेवा हमी कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याबाबत**

**(४३) १११२४३ (१८-०४-२०१८). ॲड.गौतम चाबुकस्वार (पिंपरी), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.मोहन फड (पाथरी), श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर), श्री.विनायकराव जाधव-पाटील (अहमदपूर), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्याचे मुख्य सेवा हमी आयुक्त यांनी कोणत्या सेवा या सेवा हमी कायद्यात अधिसूचित करावयाच्या याचा अधिकार नसल्याबाबत निवेदन शासनाला दिले असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात तीन वर्षानंतरही सदर कायद्याची प्रभावी अंमलबजावणी होवू शकलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सरकारी कार्यालयात आपले कुठलेही काम विशिष्ट दिवसांतच होईल याची खात्री शासन सामान्य नागरीकांना अजूनही सदर कायद्याच्या चौकटीत देवू शकलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(५) असल्यास, सदर चौकशीअंती सेवा हमी कायद्याची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०५-२०१८) :** (१) नाही.

तथापि एका प्रकरणामध्ये राज्य सेवा हक्क आयोगाने दिनांक ९ जानेवारी, २०१८ रोजी शासनास सादर केलेल्या शिफारशींमध्ये शासन / सार्वजनिक प्राधिकरण यांनी ते सध्या देत असलेल्या सर्व सेवांची मास्टर लिस्ट करून त्या अधिसूचित करण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम आखण्याबाबत शिफारस केली आहे.

(२) व (३) सदर अधिनियमाची अंमलबजावणी अद्याप होऊ शकली नाही किंवा शासन नागरिकांना विशिष्ट मुदतीतच सेवा देऊ शकलेले नाही, ही बाब वस्तुस्थितीवर आधारित नाही.

या अधिनियमांतर्गत आज अखेर एकूण ४६२ लोकसेवा अधिसूचित करण्यात आलेल्या असून त्यापैकी ३९९ लोकसेवा ऑनलाईन उपलब्ध आहेत.

(४) व (५) सेवा हमी कायद्याच्या अंमलबजावणी साठी पुढील कार्यवाही करण्यात आली आहे.

राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त हे पद दिनांक १ मार्च, २०१७ पासून भरण्यात आले असून सदर कार्यालय निर्मल इमारत, नरिमन पॉईंट, मुंबई येथे कार्यरत आहे.

शासन / सार्वजनिक प्राधिकरण यांनी ते सध्या देत असलेल्या सर्व सेवांची मास्टर लिस्ट करून त्या अधिसूचित करण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम आखण्याबाबत सर्व विभागांना सूचित करण्यात आले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दक्षिण सोलापूर तालुक्यातील (जि.सोलापूर) बोरामणी येथे आंतरराष्ट्रीय विमानतळ उभारण्याबाबत**

**(४४) १११९१८ (१७-०४-२०१८). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दक्षिण सोलापूर तालुक्यातील (जि.सोलापूर) बोरामणी येथे आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रस्तावित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत एअरपोर्ट ऑथेरिटी ऑफ इंडिया व महाराष्ट्र शासन यांच्यामध्ये करार झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील विमानतळाचे काम तातडीने सुरु करावे यासाठी मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. मुख्यमंत्री यांना दिनांक १० सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास पत्र दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या पत्राची दखल घेऊन शासनाने सदर विमानतळाचे काम सुरु व्हावे यासाठी केंद्र सरकारकडे कोणता पाठपुरावा केला आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०५-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) बोरामणी, जि.सोलापूर येथे विमानतळ विकसित करण्यासंदर्भात भारतीय विमानतपत्तन प्राधिकरण व महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी यांच्यात संयुक्त कंपनी (Joint Venture) स्थापन करण्याचे प्रस्तावित आहे. तथापि, अद्याप ही संयुक्त कंपनी स्थापन झालेली नाही.

(३) व (४) बोरामणी येथील विमानतळाचे काम तातडीने सुरु करावे यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे डिसेंबर २०१७ मध्ये मा.मुख्यमंत्री महोदयांना पत्र दिले आहे.

तथापि, बोरामणी, जि.सोलापूर येथे ग्रीनफील्ड विमानतळ उभारण्यासाठी आवश्यक त्या परवानग्या घेण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. आवश्यक त्या परवानग्या मिळाल्यानंतर तसेच भूसंपादन प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर सदर विमानतळ विकासाबाबत आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## श्री सिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई येथील अस्थायी कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्याबाबत

**(४५) ११२२३८ (१८-०४-२०१८). श्री.सुनिल शिंदे (वरळी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) श्री सिद्धिविनायक गणपती मंदिर न्यास, प्रभादेवी, मुंबई येथे गत अनेक वर्षापासून अस्थायी स्वरुपात कार्यरत असलेल्या सुमारे १२९ कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्याबाबतची मागणी दिनांक १० एप्रिल, २०१७ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे लोकप्रतिनिधीनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने सदरहू मंदिर न्यासातील अस्थायी कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्याबाबत शासनाकडून अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०५-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) श्री सिध्दिविनायक गणपती मंदिर विश्वस्तव्यवस्था (प्रभादेवी) अधिनियम, १९८० मधील कलम १४(२) नुसार श्री सिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास आस्थापनेवरील पदांची सेवाप्रवेश नियमावली राजपत्रात प्रसिध्द करणे आवश्यक आहे.तथापि,सदर न्यासाचे सेवाप्रवेश नियम राजपत्रात प्रसिध्द झाले नाहीत. न्यासाला अधिकारी व कर्मचारी यांच्या सेवेचे विनियम तयार करुन शासनास सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे. सदर सेवाप्रवेश नियम राजपत्रात प्रसिध्द झाल्यानंतर अस्थायी कर्मचाऱ्यांना स्थायी स्वरुपात सामावून घेण्याबाबत शासन स्तरावरुन उचित कार्यवाही करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील हुतात्मा स्मारके दुरूस्ती निधी खर्च न केल्यामुळे परत गेल्याबाबत

**(४६) ११२७८८ (१८-०४-२०१८). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यभरात २०६ हुतात्मा स्मारकांची दुरूस्ती करण्यासाठी शासनाने रुपये २५ कोटी चा निधी देऊ केला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहु निधीचा विनियोग झाला नसून तो शासनाकडे परत गेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उस्मानाबाद जिल्ह्यातील किती हुतात्मा स्मारके दुरूस्ती करावयाची आहे व त्यासाठी किती निधी मंजुर करण्यात आला आहे,

(४) असल्यास, स्वातंत्र्यलढ्यातील हुतात्म्यांच्या स्मृती जपण्यासाठी जिल्हानिहाय किती निधी मंजुर करण्यात आला होता,

(५) असल्यास, सदर निधी परत जाण्याची कारणे काय आहेत व स्मारकांची दुरूस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१८-०५-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) अंशत: खरे आहे. सन २०१७-१८ या वित्तीय वर्षात एकूण रु.९,२५,४२,६७१/- इतका निधी खर्च झालेला नाही.

(३) उस्मानाबाद जिल्ह्यात एकूण ११ हुतात्मा स्मारकांसाठी सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाकरिता रु.१,१९,६४,४७०/- व सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरिता रु. ७८,७२,९४२/- इतका निधी वितरित करण्यात आला आहे.

(४) राज्यातील एकूण २०६ हुतात्मा स्मारकांसाठी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात प्रति स्मारक रु.७,१५,७२२/- या प्रमाणे एकूण रु. १७,५०,००,०००/- इतका निधी मंजुर करुन वितरित करण्यात आला आहे.

(५) उस्मानाबाद जिल्ह्यात एकूण ११ हुतात्मा स्मारकांसाठी वितरित करण्यात आलेला निधी शासनास समर्पित करण्यात आलेला नाही. वितरित करण्यात आलेला निधी क्षेत्रिय स्तरावरुन हुतात्मा स्मारकांच्या दुरुस्तीसाठी बांधकाम विभागास वर्ग करण्यात आला असून बांधकाम विभागामार्फत दुरुस्तीची कामे प्रगती पथावर आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

### श्री मठ संस्थांन, दाभोली (ता.वेंगुर्ला, जि.सिंधुदुर्ग) येथील विश्वस्तांनी केलेल्या नियमबाह्य कारभाराच्या चौकशीबाबत

**(४७) ११३८६० (१८-०४-२०१८). श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.सुनिल शिंदे (वरळी), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री. मठ संस्थांन, दाभोली (ता. वेंगुर्ला, जि. सिंधुदुर्ग) या संस्थांनच्या सदस्यांनी विश्वस्तांनी केलेल्या नियमबाह्य कारभाराबाबत मा. मुख्यमंत्री आणि धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सिंधुदुर्ग

यांच्या कार्यालयामार्फत अतिशय संथ गतीने चौकशी सुरु असून आजमितीस ६ महिन्यांपेक्षा अधिक कालावधी लोटला तरी चौकशी पूर्ण झाली नसल्याची गंभीर बाब माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू तक्रारीच्या अनुषंगाने सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सिंधुदुर्ग यांनी अद्यापपर्यंत केवळ सुनावणीच्या तारखा देण्यात कालापव्यय केला असून मठाचे कोणतेही अभिलेखे अद्यापपर्यंत तपासलेले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी अहवाल देण्यात सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सिंधुदुर्ग यांच्याकडून करण्यात आलेल्या विलंबाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, सदरहू चौकशीत काय निष्पन्न झाले आहे व तद्नुसार याप्रकरणी दिरंगाई करणाऱ्या संबधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत तसेच सदर प्रकरणाचा तपास अन्य अधिकाऱ्याकडे वर्ग करून सदर प्रकरणाची चौकशी करण्याच्या दृष्टीने शासनाने अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१५-०५-२०१८) :** (१) सदर तक्रारीच्या अनुषंगाने सिंधुदुर्ग कार्यालयामार्फत अतिशय संथगतीने चौकशी सुरु असल्याचे म्हणणे खरे नाही. सदर निरीक्षण चौकशी क्र.१९/१७ प्रकरणी संबंधितांचे जबाब नोंदविणे बाकी असून तसेच न्यासाच्या संपुर्ण दप्तराची तपासणी करण्याची कार्यवाही चालू आहे.

(२) हे खरे नाही.

सदर तक्रार प्रशासकीय स्वरुपाची असल्याने सुनावणीच्या तारखा देण्याचा प्रश्न येत नाही. न्यासाचे सन २००७ ते आजपर्यंत संपूर्ण दप्तराची तपासणी करणेची कार्यवाही चालू असून, सदर दप्तराची तपासणी लवकरात लवकर पुर्ण करण्यात येईल.

(३) हे खरे नाही.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने तक्रारदार व विश्वस्त यांचे जबाब नोंदविणे बाकी असल्याने तक्रारदार त्यांचे जबाबानंतर तसेच न्यासाच्या संपूर्ण दप्तराची तपासणी करणेची कार्यवाही प्रलंबित असल्याने चौकशीत अद्याप निष्पन्न झालेले नसून अहवाल प्रलंबित आहे.

(४) संबंधित न्यासाचे विश्वस्त व तक्रारदार यांचा जबाब नोंदविणे बाकी असल्याने त्यांचे जबाबानंतर तसेच न्यासाच्या संपूर्ण दप्तराची तपासणी करणेची कार्यवाही प्रलंबित असल्याने चौकशीत अद्याप निष्पन्न झालेले नसून अहवाल प्रलंबित आहे.

(५) याबाबत प्रश्न उद्भवत नाही.

---

### नाशिक येथे बनावट कागदपत्रे सादर करुन फार्मासिस्ट म्हणून नोंदणी केल्याप्रकणी एका महिलेवर गुन्हा दाखल करण्यात आल्याबाबत

**(४८) ११४५९५ (१८-०४-२०१८). ॲड.वारीस पठाण (भायखळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथे एका महिलेवर बनावट कागदपत्रे सादर करुन फार्मासिस्ट म्हणून नोंदणी केल्याप्रकणी गुन्हा दाखल करण्याच्या सूचना महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषदेने केले असूनही मुलुंड पोलीसांनी अद्यापी अडीच महिन्यांत गुन्हा नोंदविला नसल्याची बाब दिनांक १ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास उघडकीस आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी पोलीसांनी केलेल्या चौकशीत दीड लाख रुपयांचे बदल्यात औषधनिर्माण शास्त्राची पदविका देऊ असे सांगुन फसवणूक झाल्याचे सदर महिलेचे म्हणणे आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी संपूर्ण चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार संबंधितांविरुद्ध तसेच अशाप्रकारे बोगस पदवी, पदविका देणारे एखादे रॅकेट सक्रिय असल्यास त्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२५-०५-२०१८) :** (१) हे खरे नाही.

सदर प्रकरणी दिलेल्या अर्जाची चौकशी करुन दिनांक ३१.०१.२०१८ रोजी मुलुंड पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. ४०/२०१८ भा.दं.वि. कलम ४२०, ४६५, ४६८, ४७१, ५११ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.
(२) व (३) या प्रकरणातील महिला आरोपी हिच्याकडे बोगस पदवीबाबत तपास करुन त्यातुन इतर आरोपी/सक्रीय रॅकेट यांचा सहभाग आहे किंवा कसे याबाबत तपास करण्यात येत असुन नमुद गुन्हा तपासाधीन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळातील आर्थिक गैरव्यवहारप्रकरणी न्यायालयात सुरु असलेल्या खटल्यासाठी विशेष सरकारी वकिलाच्या नियुक्तीबाबत**

**(४९) ११५५०७ (१८-०४-२०१८). श्री.रमेश कदम (मोहोळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळातील आर्थिक गैरव्यवहारप्रकरणी न्यायालयात सुरु असलेल्या खटल्यासाठी शासनाने विशेष सरकारी वकिल म्हणून कोणाची नियुक्ती केली आहे,
(२) असल्यास, सदर सरकारी वकिल नियुक्तीसाठी निकष, पात्रता, अटी आणि शर्ती काय आहेत व त्यांना देण्यात येत असलेले मानधन, वाहतूक भत्ता व दैनिक भत्ता आतापर्यंत किती देण्यात आला आहे,
(३) असल्यास, याबाबतची सविस्तर माहिती लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाच्या तत्कालीन अध्यक्ष यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये दिनांक १२ जानेवारी, २०१८ व दिनांक १४ फेब्रुवारी, २०१८ रोजी जनमाहिती अधिकारी, विधी व न्याय तसेच गृहविभाग यांच्याकडे माहिती मागीतली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त गैरव्यवहारातील संबंधीत दोषींवर अद्यापपर्यंत कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०५-२०१८) :** (१) लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळातील आर्थिक गैरव्यवहारप्रकरणी न्यायालयात सुरु असलेल्या खटल्यासाठी शासनाने विशेष सरकारी वकील म्हणून ॲड.श्री.प्रविण चव्हाण यांची नियुक्ती केली आहे .
(२) मुकुल दलाल व इतर विरुध्द शासन (फौजदारी अपील क्र.३०५/८८) या प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालयाने विहित केलेले निकष विचारात घेऊन तसेच, महाराष्ट्र विधि विषयक कामकाज नियमावली, १९८४ (नियम २२ सुधारीत) मधील तरतूदीनुसार विशेष सरकारी वकीलांची नियुक्ती करण्यात येते.

दहिसर पो.स्टे.गु.र.नं.३३६/२०१५ प्रकरणी ॲड.श्री.प्रविण चव्हाण यांना दि.१७.०४.२०१८ रोजी रू.२,४०,०००/- इतके मानधन अदा करण्यात आलेले आहे.
(३) होय.

तत्कालीन अध्यक्ष, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ यांनी दि. १२.०१.२०१८ रोजीच्या माहिती अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत विधि व न्याय विभाग व गृह विभाग यांच्याकडे माहिती मागितली आहे. तसेच, दि. १४.०२.२०१८ रोजीचा माहिती अधिकार अपिल अर्ज प्रथम अपिलीय अधिकारी, विधि व न्याय यांना प्राप्त झाला आहे. त्यावर दिनांक २७.०२.२०१८ रोजी सुनावणी घेण्यात येऊन अर्जदारास निकाल कळविण्यात आले आहेत.
(४) उक्त घोटाळा प्रकरणी दाखल ७ गुन्हयांचा तपास गुन्हे अन्वेषण विभागामार्फत सुरु आहे. याप्रकरणी आरोपी असलेले महामंडळाचे तत्कालीन अध्यक्ष, महामंडळातील अधिकारी व कर्मचारी यांना अटक करण्यात आली असून विहित कालावधीत त्यांचेविरुध्द संबंधित न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दिव्यांग, जेष्ठ व दुर्लक्षित घटकांसाठी विशेष न्यायालये स्थापन करणेबाबत**

**(५०) ११५८०० (१९-०४-२०१८). डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दिव्यांग,वरिष्ठ नागरिक आाणि समाजातील दुर्लक्षित घटकांना न्याय मिळावा यासाठी ११ ठिकाणी विशेष न्यायालये स्थापन करण्याचा निर्णय माहे फेब्रुवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास प्रस्तूत प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१९-०५-२०१८) :** (१) व (२) होय, हे खरे आहे. दिव्यांग, वरिष्ठ नागरिक व समाजातील दुर्लक्षित घटक यांच्याशी संबंधित १००० पेक्षा जास्त प्रकरणे प्रलंबित आहेत अशा परभणी, मुंबई, ठाणे, अहमदनगर, सातारा, लातूर, पुणे, नागपूर, सांगली, नाशिक व औरंगाबाद या ११ ठिकाणी विशेष न्यायालये स्थापन करण्यास विधि व न्याय विभाग, शासन निर्णय क्र.जगन्या-१३१४/प्र.क्र.१६४/का.९, दि.३ मार्च, २०१८ अन्वये शासन मान्यता देण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.